सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १९० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### एसटी कर्मचाऱ्यांना सरकारकडून दिवाळी बोनस, संप टळला!



मुंबई : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विविध विभागातील कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला होता. मात्र, सुरुवातीला एसटी कर्मचाऱ्यांना या यादीत स्थान नव्हते. त्यामुळे नाराज एसटी कर्मचारी संघटनांनी संपाचं इशारा दिला होता. आता सरकारने त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत बोनस जाहीर केला आहे, ज्यामुळे संप टळला असून कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एसटी कर्मचारी संघटनांसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. झालेल्या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांसाठी काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. यामध्ये दिवाळी बोनस म्हणून प्रत्येकी ६००० रुपयांचं सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, १२,५०० रुपयांची उचल घेण्याची सुविधा कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवाय, प्रत्येक महिन्याला ६५ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, जो पुढील ४८ आठवड्यांपर्यंत लागू राहणार आहे.

### लालू प्रसाद यादव, राबडी देवी, तेजस्वी यादव यांच्यावर आरोप निश्चित

नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर –आगामी बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयआरसीटीसी हॉटेल भ्रष्टाचार प्रकरणात लालू प्रसाद यादव यांच्यावर आरोप निश्चित करण्यात आले आहेत. राऊस अव्हेन्यू येथील विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयाने आयआरसीटीसी हॉटेल भ्रष्टाचार प्रकरणात माजी रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, १२० आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (पीसी कायदा) अंतर्गत आरोप निश्चित केले आहेत. न्यायालयाने राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांच्यावर फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याचे आरोप देखील निश्चित केले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना विचारले की, त्यांनी गुन्हा कबूल केला आहे की, खटल्याला सामोरे जाणार आहे. तिन्ही आरोपींनी त्यांचा गुन्हा नाकारला आणि सांगितले की, ते खटल्याला सामोरे जातील आणि आरोपांना आव्हान देतील.

### निवडणुका एकत्रित लढवण्याच्या निर्णयावर या आठवड्यात निर्णय : पवार

मुंबई : राज्यात सध्या स्थानिक निवडणुकीच्या उद्देशाने सर्व पक्षांकडून पूर्वतयारी केली जात आहे. या निवडणुका महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र लढणार की नाही याबाबत वेगवेगळे अंदाज लावले जात आहेत. यादरम्यान शरद पवार यांनी मोठं विधान केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढवण्याच्या निर्णयावर या आठवड्यात निर्णय घेतला जाईल असं त्यांनी जाहीर केलं आहे. महाविकास आघाडीचे नेते एकत्रित बसून निर्णय घेतील असंही त्यांनी सांगितलं आहे. बैठकीत शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना, नेत्यांना जातीय सलोखा ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर बोलत असताना जातीवाचक बोलू नका. सरकारमधील काही नेते व मंत्री सध्या वादग्रस्त बोलत आहेत. बोलताना प्रेमाची भाषा वापरा अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

## हे भाजपा सरकार आहे, जे बोलतो ते करतो : अमित शाह



जयपूर : हे भाजप सरकार आहे, काँग्रेस सरकार नाही. आम्ही जे बोलतो ते करतो, असं विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले. ते जयपूर येथील सभेला संबोधित करताना बोलत होते.

अमित शाह म्हणाले, आज चार लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रस्तावाचा भूमिपूजन समारंभ झाला. रायझिंग राजस्थान समिट सुरू असताना मीही येथे होतो. ३५ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले, पण किती अंमलात आणले जातील, अशी अशोक गेहलोत यांची टिप्पणी मी वाचली? त्यावेळी आम्ही कोणालाही उत्तर दिले नाही. आज मी गेहलोत यांना सांगू इच्छितो की हे भाजप सरकार आहे, काँग्रेस सरकार नाही. आम्ही जे बोलतो ते करतो.

पुढे ते म्हणाले, इतक्या कमी वेळात, भजनलाल सरकारने ३५ लाख कोटी रुपयांपैकी ७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार अंमलात आणले आहेत याचा मला आनंद आहे. ही एक महत्त्वाची कामगिरी आहे. देशभरात होणाऱ्या गुंतवणूक शिखर परिषदांमध्ये सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा सरासरी दर भजनलाल सरकार ओलांडेल असा मला पूर्ण विश्वास आहे.

अमित शाह यांनी जयपूर एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (जेईसीसी) येथे तीन नवीन फौजदारी कायद्यांवरील राज्यस्तरीय प्रदर्शनाचे उद्घाटन केले. रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट २०२४ अंतर्गत प्राप्त झालेल्या ४ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रस्तावांमधून अमित शहा यांनी पायाभरणी केली. अमित शहा यांनी सुमारे ९,६०० कोटी रुपयांच्या १,१०० विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन देखील केले. कार्यक्रमात, पंतप्रधान सूर्य घर योजनेअंतर्गत १५० युनिट मोफत वीज योजनेसाठी नोंदणी देखील सुरू करण्यात आली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तीन महिन्यांत तिसऱ्यांदा राजस्थानला भेट देत आहेत. शहा यांनी यापूर्वी २१ सप्टेंबर रोजी जोधपूरला भेट दिली होती, जिथे त्यांनी रामराज नगर चोखा येथील पारसमल बोहरा मेमोरियल कॉलेजच्या इमारतीची पायाभरणी केली होती. ही भेट २२ दिवसांपूर्वी झाली होती. अमित शहा यांनी १७ जुलै रोजी जयपूर येथे सहकार परिषदेचे उद्घाटन केले. या वर्षी ६ एप्रिल रोजी त्यांनी कोटपुतली येथील पाओटा येथे एका जाहीर सभेला संबोधित केले.

## 'मत चोरी' संदर्भातील याचिका कोर्टाने फेटाळली



नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत अपारदर्शकतेचे आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर सुप्रीम कोर्टात एक याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यामध्ये कथित 'मत चोरी' प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. तसेच न्यायालयाने स्पष्ट केले की, हा विषय निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येतो, त्यामुळे याचिकाकर्त्यांनी हे प्रकरण आयोगासमोर मांडावे.

राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी कर्नाटक निवडणुकीत अपारदर्शकतेचा आरोप केला होता. त्यांनी बेंगळुरू सेंट्रलसह काही मतदारसंघांमध्ये कथितपणे 'मतांची चोरी' झाल्याचा आरोप केला होता. याच प्रकरणी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाली होती.या याचिकेत मागणी करण्यात आली होती की निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष तपास पथक गठीत करून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.मात्र, न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाला बागची यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळत स्पष्ट केले की निवडणूक प्रक्रिया व त्यातील त्रुटींचा तपास करणे हे निवडणूक आयोगाचे काम आहे आणि त्याच्याकडे हे प्रकरण सोपवले जावे.सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले की, आम्ही याचिकाकर्त्याच्या वकिलांचे म्हणणे ऐकले. ही याचिका जनहित याचिकेच्या स्वरूपात दाखल करण्यात आली आहे, पण आम्ही अशा प्रकारच्या याचिकेवर सुनावणी घेणार नाही. याचिकाकर्त्यांनी हे प्रकरण थेट निवडणूक आयोगाकडे घालावे.याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करत असलेले वकील रोहित पांडे यांनी न्यायालयात सांगितले की, निवडणूक आयोगाकडे यासंबंधी तक्रार केली होती, पण काहीही कारवाई झाली नाही. तरीही, सुप्रीम कोर्टाने सुनावणी घेण्यास स्पष्ट नकार दिला.

## कॅनडाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी घेतली मोदींची भेट

### अनीता आनंद आणि जयशंकर यांच्यात बैठक



नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर : कॅनडाच्या परराष्ट्रमंत्री अनीता आनंद यांनी सोमवारी भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी भेट घेतली. या भेटीत द्विपक्षीय संबंधांना नवी ऊर्जा देण्यावर भर देण्यात आला.

पंतप्रधान मोदी यांनी आनंद यांचे स्वागत करताना सांगितले की, त्यांचा हा दौरा भारत-कनाडा संबंधांना नवी दिशा आणि गती देईल. पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनानुसार, मोदींनी नमूद केले की व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी आणि लोक-ते-लोक संबंध यामधील सहकार्य वाढविणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, जूनमध्ये जी-७ शिखर परिषदेदरम्यान कनाडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी त्यांची 'अत्यंत फलदायी' चर्चा झाली होती.ही अनीता आनंद यांची, परराष्ट्रमंत्री म्हणून नेमणूक झाल्यानंतरची पहिली भारत भेट आहे.

अनीता आनंद यांनी त्यांच्या स्वागताबद्दल आभार मानले आणि सांगितले, आज दिल्लीत तुमच्यासोबत भारत-कनाडा संबंध वृद्धिंगत करण्याची संधी मिळाल्याने आम्ही अत्यंत आभारी आहोत.त्यांनी सांगितले की, १३ मे रोजी मी परराष्ट्रमंत्री म्हणून नेमणूक झाल्यानंतर आमच्यात अनेक चर्चांचा सकारात्मक अनुभव आला. पंतप्रधान कार्नी यांना जी-७ परिषदेत पंतप्रधान मोदींचे स्वागत करताना आनंद झाला आणि त्यावेळची चर्चा आजच्या संवादासाठी दिशादर्शक ठरली.त्यांनी पुढे म्हटले की, आपण आज भारत-कनाडा संयुक्त निवेदनावर चर्चा करणार आहोत, ज्यात विविध मुद्दे समाविष्ट असतील - हे मुद्दे द्विपक्षीय संबंध अधिक उंचीवर घेऊन जाण्यास मदत करतील.

आनंद म्हणाल्या, आपण सुरक्षाविषयक संवादाबाबत जे मत व्यक्त केले, त्याचे मी कौतुक करते. आमचे सहकार्य महत्त्वाचे खनिज, ऊर्जा, एआय आणि हवामानबदल या क्षेत्रांत वाढत असताना सुरक्षा संवाद सुरूच राहील.त्यांनी स्पष्ट केले की, काही आठवड्यांपूर्वी दोन्ही देशांतील अधिकाऱ्यांमध्ये झालेली सुरक्षा व कायदा अंमलबजावणीविषयक बैठक अत्यंत उपयुक्त ठरली, आणि अशा संवादाला दोन्ही सरकारांचा पाठिंबा आहे. तसेच, आनंद म्हणाल्या की, कनाडा एक पूरक अर्थव्यवस्था, खुले समाज, विविधता आणि बहुसंस्कृती असलेला देश आहे - जे दीर्घकालीन, स्थिर आणि विश्वासार्ह भागीदारीसाठी आवश्यक असतात. त्यामुळे दोन्ही देशांचे सरकार या संबंधांना अधिक दृढ करण्यासाठी कटिबद्ध आहेत. अनीता आनंद यांचा हा दौरा, २०२३ मध्ये निर्माण झालेल्या भारत-कनाडा तणावानंतर दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या एक महत्त्वाच्या पावलासारखा मानला जात आहे.

हा तणाव तेव्हा निर्माण झाला होता, जेव्हा कनाडाचे तत्कालीन पंतप्रधान मार्क कार्नी यांनी असा आरोप केला होता की, खलिस्तानी अतिरेकी हरदीप सिंह निज्जर यांच्या हत्येत भारताची संभाव्य भूमिका आहे.

### जयशंकर-अनंद यांच्यात सकारात्मक चर्चा

या दौऱ्यादरम्यान अनीता आनंद यांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशीही चर्चा केली. जयशंकर म्हणाले की, २६ मे रोजी झालेल्या आमच्या टेलिफोनिक संवादानंतर ही आमची चर्चा पुढे सुरू असलेल्या सकारात्मक संवादाचा भाग आहे. भारत-कनाडा द्विपक्षीय संबंध गेल्या दोन महिन्यांत सातत्याने प्रगती करत आहेत. जयशंकर पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी जी-७ परिषदेदरम्यान कार्नी यांच्याशी झालेल्या चर्चेत स्पष्ट केले होते की, भारत सकारात्मक विचारसरणीसह पुढे जायला इच्छुक आहे. आज सकाळी तुम्ही पंतप्रधान मोदींना भेटलात आणि भारत-कनाडा सहकार्याबद्दल त्यांची दृष्टीकोन जाणून घेतला. तसेच त्यांनी स्पष्ट केले की, आजच्या चर्चेत आम्ही एक महत्वाकांक्षी 'रोडमॅप' तयार केला आहे, ज्यामुळे व्यापार, गुंतवणूक, कृषी, विज्ञान व तंत्रज्ञान, नागरी अणुऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), महत्त्वाचे खनिज आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढेल.

## संघ एक सांस्कृतिक शक्ती, देशभक्त संघटन : फडणवीस




अमरावती, १३ ऑक्टोबर - यापूर्वी अनेकवेळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला. इंदिरा गांधी यांनी संघावर बंदी घातल्यामुळे त्यांना पायउतार व्हावं लागलं. संघ एक सांस्कृतिक शक्ती आहे. देशभक्त संघटन आहे. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित, मूल्याधिष्ठीत अशा प्रकारच्या मानवनिर्मितीचे कार्य संघ करते. जे लोक प्रसिद्धीकरता संघाच्या शाखा, बैठका बंद करण्याची मागणी करतात, त्यांच्याकडे आम्ही ढुंकूनही पाहत नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अमरावती विभाग भाजपा पदाधिकारी बैठकीदरम्यान माध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

कर्नाटकचे ग्रामीण विकास आणि आयटी मंत्री प्रियांक खरगे यांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना पत्र लिहिले आगे. यात सरकारी जागेत संघाच्या कार्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी केली आहे. प्रियांक खरगेंच्या मागणीवरुन भाजपकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर प्रतिक्रिया देताना ते वडिलांच्या भरवश्यावर राजकारण करत असून सदर वक्तव्य हे प्रसिद्धीसाठी करत असल्याचेही म्हटलं आहे. प्रियांक खरगेंनी म्हटलं आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सरकारी शाळा, क्रीडांगणे आणि मंदिरांमध्ये शाखा आणि बैठका आयोजित करून मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये फूट पाडणारे विचार पसरवत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना संविधानाच्या तत्वांविरुद्ध काम करत आहे आणि तिचे कार्यकर्ते मुलं आणि तरुणांमध्ये अशांतता पसरवत आहेत, ज्यामुळे भारताची एकता आणि अखंडता धोक्यात येत आहे.

## दोन अमेरिकन व एका ब्रिटिश प्राध्यापकास मिळणार अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार

स्टॉकहोम, १३ ऑक्टोबर : अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाची सोमवारी(दि.१३) घोषणा झाली आहे. यंदाचे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक जोएल मोकिर (यूएसए), पीटर हॉविट (यूएसए) आणि फिलिप अघियन (यूके) यांना प्रदान करण्यात आले आहे.

नोबेल समितीने म्हटले आहे की, या अर्थशास्त्रज्ञांनी नवोपक्रमामुळे आर्थिक विकास कसा होतो हे दाखवून दिले आहे. तंत्रज्ञान वेगाने बदलते आणि आपल्या सर्वांवर परिणाम करते. नवीन उत्पादने आणि उत्पादन पद्धती सतत जुन्या उत्पादनांची जागा घेतात आणि ही प्रक्रिया कधीही संपत नाही. हा शाश्वत आर्थिक विकासाचा आधार आहे, ज्यामुळे जगभरातील लोकांचे जीवनमान, आरोग्य आणि राहणीमान सुधारते.




विजेत्यांना ११ दशलक्ष स्वीडिश क्रोना (१०.३ कोटी), सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र मिळेल. हे पुरस्कार १० डिसेंबर रोजी स्टॉकहोममध्ये प्रदान केले जातील. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाला औपचारिकरीत्या 'अल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ अर्थशास्त्रातील स्वीडनच्या सेंट्रल बँकेचा पुरस्कार' असे म्हणतात. स्वीडनच्या सेंट्रल बँकेने १९६८ मध्ये हा पुरस्कार सुरू केला होता.मागील आठवड्यातच वैद्यकीय, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, साहित्य आणि शांतता या क्षेत्रांतील नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती.

## शिक्षण हे काही लोकांसाठी विशेषाधिकार नसावा - राहुल गांधी



नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर : शिक्षणाची सुरुवात कुतूहल आणि मोकळ्या मनाने होते. आपल्याला असे वातावरण हवे आहे जिथे मुले भीती किंवा दबावाशिवाय प्रश्न विचारू शकतील. शिक्षण हे काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नसावा, कारण तो स्वातंत्र्याचा खरा पाया आहे. असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दक्षिण अमेरिकेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले त्यांनी शिक्षण, लोकशाही आणि स्वातंत्र्य याबाबत महत्त्वपूर्ण विचार मांडले.

राहुल गांधी यांनी पुढे सांगितले की प्रत्येक मुलाला शिकण्याचे आणि विचार करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. शिक्षण हे केवळ श्रीमंत किंवा काही मोजक्या लोकांपुरते मर्यादित राहू नये. भारताने लोकशाही वातावरणात भरभराटीला येणारी नवी उत्पादन व्यवस्था निर्माण करावी, असेही त्यांनी मत व्यक्त केले. यासाठी अमेरिका किंवा पेरूसारख्या देशांसोबत भागीदारी फायदेशीर ठरू शकते, असे राहुल गांधी यांनी नमूद केले. काँग्रेस पक्षाने रविवारी राहुल गांधी यांनी पेरूच्या पोंटिफिकल कॅथोलिक विद्यापीठ आणि चिली विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी केलेल्या संवादाचा १२ मिनिटे १९ सेकंदांचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये शिक्षण, लोकशाही आणि जगातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. राहुल गांधी सध्या कोलंबिया, ब्राझील, पेरू आणि चिली या दक्षिण अमेरिकन देशांच्या १० दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी विविध विद्यापीठांमध्ये हजेरी लावून भारतीय आणि जागतिक राजकारण, शिक्षण तसेच सामाजिक मुद्द्यांवर चर्चा केली आहे.

८ ऑक्टोबर रोजी त्यांनी कोलंबियातील मेडेलोन येथील पेर्गामिनो कॉफी शॉपला भेट दिली. त्यांच्या यूट्यूब चॅनलवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ते स्वतः कॉफी बनवण्याचा अनुभव घेताना दिसतात. भारतातही खास कॉफीची शक्यता आहे, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. व्हिडिओमध्ये राहुल गांधी म्हणताना दिसतात, पेर्गामिनो येथे मला शिकवण्यात आले की प्रत्येक कप कॉफी हा विज्ञान आणि सर्जनशीलतेचा मिलाफ आहे. कोलंबियामध्ये ५ लाख कुटुंबे कॉफीला केवळ पीक म्हणून नव्हे तर जीवनशैली म्हणून जगतात. त्यांची कला ही देशाची ओळख आहे.

राहुल गांधी यांनी भारतातील कॉफी उत्पादनाचा संदर्भ देताना सांगितले की, वायनाड आणि कुर्गच्या टेकड्यांपासून ते अराकू आणि निलगिरीपर्यंत भारतातही अशीच क्षमता आहे. आपल्या समृद्ध माती आणि मेहनती शेतकऱ्यांसह आपण जागतिक स्तरावर विशेष कॉफी कहाणी तयार करू शकतो.

### मी फार तर पवार, फडणवीस आणि मोदींपर्यंत जाऊ शकतो - भुजबळ

येवला, १३ ऑक्टोबर - मी डोनाल्ड ट्रम्प यांच्या पर्यंत जाऊ शकत नाही फार झाले तर माझी उडी ही दिल्लीपर्यंत आहे. त्यामुळे पालकमंत्री पदाचा निर्णय आता कोण घेतं हे मला माहित नाही, असे मत मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे.मुंबईमध्ये सुरू असलेल्या कबूतर खान्यावर देखील छगन भुजबळ म्हणाले की मला असं वाटतं आता येवल्यामध्ये चिमणी पार्क सुरू करावे कारण वेगवेगळ्या पक्षांचे प्राण्यांचे पार्क सुरू झाले म्हणजे नागरिकांनाही आनंद होतो आणि वेगळ्या राजकीय पक्षाची निर्मिती तरी होते त्यामुळे यावर आता विचार करावा लागेल असा मिश्किल टोला देखील त्यांनी यावेळी दिला आहे.



## साताऱ्यात यशवंत बँकेत ११२ कोटींचा घोटाळा; ५० जणांवर गुन्हा दाखल

### बनावट कर्ज, कागदपत्रांमध्ये फेरफार; ठेवीदारांच्या कोट्यवधींच्या निधीचा उद्देशबाह्य वापर करून केलेला आर्थिक अपहार उघडकीस

फलटण: फलटण येथील यशवंत सहकारी बँकेत एका अत्यंत धक्कादायक आणि मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा पर्दाफाश झाला आहे. बँकेच्या तत्कालीन अध्यक्ष, संचालक आणि अधिकाऱ्यांनी मिळून तब्बल ११२ कोटी १० लाख ५७ हजार ४८१ रुपयांचा घोटाळा केल्याप्रकरणी माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्यासह एकूण ५० जणांविरुद्ध फलटण शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साताऱ्यातील सहकार क्षेत्रात या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

या गंभीर प्रकरणाची तक्रार पुण्यातील शासकीय सनदी लेखापाल मंदार देशपांडे यांनी दाखल केली आहे. त्यांनी सादर केलेल्या सनदी लेखापरीक्षण अहवालात बँकिंग व्यवहारात मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या चालू आर्थिक वर्षातील व्यवहारांसह, १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत कार्यरत असलेल्यांवरही अपहाराचा ठपका ठेवण्यात आला आहे.

लेखापरीक्षणात उघड झालेल्या माहितीनुसार, बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ आणि काही अधिकाऱ्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे संगनमत केले. त्यांनी बँकेचा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्याचा कट रचला. यासाठी त्यांनी बनावट कर्ज प्रकरणे तयार केली, खोटी आणि बनावट कागदपत्रे सादर केली. धक्कादायक बाब म्हणजे, कर्ज वितरणासाठी कोणतेही आवश्यक तारण न घेता हेतुपुरस्सरपणे कर्जे वाटली गेली.




एवढेच नव्हे तर, जुनी थकलेली कर्जाची खाती बंद झाल्याचे कागदोपत्री दाखवून, त्याऐवजी नवी खाती उघडण्यात आली आणि त्याद्वारे बँकेचा कोट्यवधींचा निधी थेट तृतीय पक्षांकडे वळवण्यात आला. तसेच, महत्त्वाच्या दस्तऐवजांमध्ये फेरफार करणे आणि खोट्या नोंदी तयार करून निधीचा उद्देशबाह्य वापर करणे असे अनेक गंभीर गैरप्रकार या आरोपींनी केले, असा स्पष्ट आरोप तक्रारीत नमूद आहे.

या घोटाळ्यात तत्कालीन अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्यासह संचालक मंडळातील नरेंद्र भोईटे, रवींद्र टोणपे, चंद्रकांत चव्हाण, अनिल चव्हाण, सुनील पावसकर, सुधीर कुलकर्णी, श्रीकृष्ण जोशी, अवधूत नाटेकर, डॉ. नचिकेत वाचासुंदर, गणपतराव निकम, नानासो पवार, पांडुरंग करपे, स्नेहन कुलकर्णी, कल्पना गुणे, महेशकुमार जाधव, अजित निकम, गोपीनाथ कुलकर्णी, जयवंत जगदाळे, डॉ. प्रदीपकुमार शिंदे, प्रसाद देशपांडे, सुहास हिरेमठ आदींची नावे प्रमुख आरोपींच्या यादीत आहेत.

त्याचबरोबर बँकेचे महत्त्वाचे अधिकारी असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष देसाई, धनंजय डोईफोडे, वैशाली मोकाशी आणि शाखा व्यवस्थापक वैशाली पावशे, केशव कुलकर्णी यांचाही या गुन्ह्यात थेट समावेश आहे. विशेष म्हणजे, शेखर चरेगावकर यांचे नातेवाईक शार्दूल उर्फ मुकुंद चरेगावकर, विठ्ठल उर्फ शौनक कुलकर्णी, राही कुलकर्णी, संहिता कुलकर्णी, वैभव कुलकर्णी, काशिनाथ कुलकर्णी, सूरज गायधनी, विभीषण सोनावणे, दिनेश नवळे यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, एकूण १९५ बोगस कर्ज खाती उघडकीस आली आहेत. आरोपींनी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर करून बँकेचे ठेवीदार आणि सभासद यांच्या हिताला मोठा तडा दिला आहे. लेखापरीक्षण अहवालात ही संपूर्ण साखळी स्पष्ट झाल्यानंतर, फलटण शहर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. शासकीय नियमांचे उल्लंघन करून निधीचा गैरवापर झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. या गंभीर गुन्ह्याची पाळेमुळे खणून काढण्यासाठी लवकरच या तपासात आर्थिक गुन्हे शाखेला (एजथ) देखील समाविष्ट केले जाण्याची शक्यता आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
# अर्थकारण
२ मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५

# दिवाळी आणि किरकोळ गुंतवणूकदार : भारतातील गुंतवणुकीची व्यापक (मॅक्रो) ते सूक्ष्म (मायक्रो) दिशा

गुंतवणुकीची गोष्ट

दिवाळीचा प्रकाश फक्त घरातच नाही, तर आर्थिक नियोजनातही उजळायला हवा. दिवाळी म्हणजे नव्या सुरुवातीचा, प्रकाशाचा आणि समृद्धीचा सण. परंतु या वर्षीचा सण केवळ आनंदाचा नाही, तर आर्थिक आत्मपरीक्षणाचा क्षणही ठरू शकतो. सणाच्या शुभमुहूर्तावर प्रत्येक गुंतवणूकदाराने आपली गुंतवणूक तपासून, पुढील आर्थिक वर्षासाठी दिशा ठरवावी, असा काळ आला आहे.

**भारताची व्यापक (मॅक्रो) झळाळी**

भारताची अर्थव्यवस्था आज जगभरातील चर्चेचा विषय बनली आहे. जागतिक मंदी, तेलाचे दर आणि राजकीय अस्थिरता यांचा सामना करतानाही भारताने ६.५ ते ७ टक्क्यांच्या जीडीपी वाढीसह स्थिरता दाखवली आहे. सरकारचा भांडवली खर्च (कॅपेक्स) सातत्याने वाढत असून, रस्ते, रेल्वे, संरक्षण, ऊर्जा आणि डिजिटल क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे.

'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांनी उत्पादन क्षेत्राला नवसंजीवनी दिली आहे. इलेक्ट्रॉनिक्स, वाहननिर्मिती, औषधनिर्मिती आणि टेक्सटाईल या क्षेत्रांत भारत वेगाने स्पर्धक देश ठरत आहे. त्यासोबतच 'चायना + १' धोरणामुळे भारतावर परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत आहे. बँकिंग क्षेत्रातही परिस्थिती स्थिरतेकडे वाटचाल करते आहे. सार्वजनिक व खाजगी बँकांनी मागील काही वर्षांत आपली आर्थिक स्थिती सुधारली असून, एनपीए प्रमाणात घट झाली आहे. डिजिटल पेमेंट आणि फिनटेकमुळे अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक आणि सर्वसमावेशक बनली आहे. ग्रामीण आणि शहरी मागणीत वाढ होत असून एफएमसीजी, वाहन आणि किरकोळ व्यापार क्षेत्रांमध्ये विक्री वाढते आहे. या सगळ्या व्यापक (मॅक्रो) बदलांमुळे देशाची आर्थिक पायाभरणी मजबूत झाली आहे.

**बदलणारा उद्योग आणि गुंतवणुकीची नवी दिशा**

भारताच्या औद्योगिक पायाभूत संरचनेत मोठे बदल होत आहेत. पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात दीर्घकालीन गुंतवणूक सुरू आहे. सौर, वारा, बॅटरी आणि हायड्रोजन या तंत्रज्ञानांमध्ये प्रचंड क्षमता आहे. सरकारच्या धोरणात्मक पुढाकारामुळे 'ग्रीन एनर्जी' हे पुढील दशकातील भारताचे बलस्थान ठरणार आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्लाऊड सेवा, सेमीकंडक्टर आणि सास (सॉफ्टवेअर अ‍ॅज ए सर्व्हिस पुरवणाऱ्या कंपन्या) कंपन्यांची मागणी झपाट्याने वाढते आहे. भारत या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात निर्यातक देश म्हणून उदयास येत आहे.

**किरकोळ गुंतवणूकदारांची सूक्ष्म (मायक्रो) दिशा**

सणासुदीच्या काळात गुंतवणुकीकडे नव्या नजरेने पाहण्याची वेळ येते. 'मुहूर्त ट्रेडिंग' ही परंपरा केवळ प्रतीकात्मकच नाही, तर गुंतवणुकीच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे. किरकोळ गुंतवणूकदारांनी या दिवाळीत आपला पोर्टफोलिओ तपासावा- कुठल्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवायची आणि कुठे घटवायची, याचा तर्कशुद्ध विचार करावा. गुणवत्तापूर्ण, नफा देणाऱ्या आणि स्थिर कंपन्यांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक ठेवावी.



सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) हे अजूनही सर्वांत प्रभावी साधन आहे. छोट्या रकमेपासून सुरुवात करून नियमित गुंतवणुकीतून मोठा फंड उभारता येतो. दीर्घकालीन गुंतवणुकीमुळे 'रुपया किमतीचा सरासरी परिणाम' (रुपी कॉस्ट अ‍ॅव्हरेजिंग) तुमच्या बाजूने काम करतो. याशिवाय, विविधीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ इक्विटी नव्हे तर डेट फंड, गोल्ड ईटीएफ, हायब्रिड फंड आणि आंतरराष्ट्रीय फंड या माध्यमांतून गुंतवणूक केल्यास जोखीम कमी होते.


सोनं हे भारतीयांच्या गुंतवणुकीचे पारंपरिक प्रतीक असले, तरी आजच्या डिजिटल काळात गोल्ड ईटीएफ किंवा सॉवरेन गोल्ड बाँड हे अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर पर्याय ठरत आहेत. स्थिर परतावा हवे असणाऱ्यांसाठी आरबीआय बाँड, एससीएसएस, टपाल बचत योजना आणि भारत बाँड ईटीएफ सारखे पर्यायही आकर्षक आहेत.

सणासुदीच्या खर्चातही थोडी गुंतवणुकीची शिस्त आणणे आवश्यक आहे. बोनस, भेटवस्तू किंवा नफा यातून काही भाग एसआयपी किंवा म्युच्युअल फंडात वळवल्यास दीर्घकालीन संपत्ती निर्माण करता येते.

**पुढील दशकातील संधी**

- भारतातील पुढील आर्थिक वाढ तीन प्रमुख दिशांनी ठरेल
- डिजिटल भारत, हरित ऊर्जा आणि ईव्ही क्रांती व ग्रामीण विकास.

ही क्षेत्रे केवळ उद्योगधंद्यांची नाहीत, तर रोजगार, निर्यात आणि गुंतवणुकीची मोठी संधी आहेत. सरकारच्या 'प्रॉडक्शन लिंक्ड इनसेंटिव्ह (पीएलआय)' योजनांमुळे उत्पादन क्षेत्रात नवचैतन्य आले आहे, तर स्टार्टअप इकोसिस्टममुळे तरुण गुंतवणूकदारांमध्ये गुंतवणुकीबाबत उत्सुकता वाढली आहे.




दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. जसे आपण घरात दिवे लावतो, तसेच आपल्या आर्थिक जीवनातही ज्ञान आणि नियोजनाचा दिवा लावणे गरजेचे आहे. भारताची व्यापक (मॅक्रो) अर्थव्यवस्था सक्षम आहे आणि त्यावर आधारित सूक्ष्म (मायक्रो) गुंतवणुकीत स्थिरतेची व समृद्धीची शक्यता दडलेली आहे.

शिस्तबद्ध गुंतवणूक, दीर्घकालीन दृष्टी आणि योग्य मार्गदर्शन- या तीन गोष्टींचा संगमच आर्थिक प्रकाशाचा खरा दीप ठरतो. या दिवाळीत केवळ घरातच नव्हे, तर आपल्या आर्थिक भविष्यामध्येही प्रकाश पसरवा- विचारपूर्वक गुंतवणूक करूया आणि समृद्धीचा मार्ग निवडूया. बघा पटतंय का ? ●●

● **शिवानी दाणी वखरे**
संचालिका, मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि.
९८६०१३३८६०

## विंडसर ईव्ही इन्स्पायर बाजारात दाखल

एमजी मोटर इंडियाने त्यांच्या ऑल-इलेक्ट्रिक क्रॉसओवर, विंडसर ईव्हीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त विंडसर ईव्ही इन्स्पायर एडिशन लाँच केली आहे. हा लिमिटेड रन व्हेरिएंट आहे, ज्यामध्ये केवळ तीनशे युनिट्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या इलेक्ट्रिक कारची एक्स शोरूम किंमत १६.६५ लाख रुपये अथवा बॅटरी-अ‍ॅज-अ-सर्व्हिस (बास) योजनेअंतर्गत ९.९९ लाख रुपये आहे. एमजी इंडियाच्या अधिकृत वेबसाईटवर बुकिंग सुरू झाली आहे. या स्पेशल आवृत्तीची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. विंडसर ईव्ही इन्स्पायर एडिशनमध्ये ड्युअल-टोन पर्ल व्हाईट आणि स्टारी ब्लॅक पेंट स्कीम आहे, जिला ग्रिल, बंपर आणि साईड मोल्डिंग्जवर गुलाबी सोन्याच्या रंगाने सजविण्यात आले आहे. १८ इंचाचे ब्लॅक फिनिश्ड अलॉय व्हील्स, ब्लॅक ओआरव्हीएम आणि डी-पिलरवरील 'इन्स्पायर' बॅजिंग मॉडेलचा रिफ्रेश लूक पूर्ण करतात. ३८ किलोवॅट क्षमतेच्या बॅटरीसह ३३२ किमीची रेंज आणि ४० मिनिटांत ०-८० टक्के जलद चार्जिंग देते. या स्पेशल कारमध्ये ३डी मॅट्स, इन्स्पायर ब्रँडेड कुशन, रियर सनशेड्स, लेदर की कव्हर्स आणि ४के डॅशकॅमसह एक क्युरेटेड एक्सेसरी पॅकचा देखील समावेश आहे. यांत्रिकदृष्ट्या, मॉडेल अपरिवर्तित आहे आणि त्यात किलोवॅट बॅटरी पॅक आहे, एकदा चार्ज केल्यावर गाडी ३३२ किलोमीटरची रेंज देते असा कंपनीचा दावा आहे. ●●



अर्थभान

# गुंतवणूक कुठे करू नये?

ही संपूर्ण मालिकाच गुंतवणुकीबद्दल आहे. आपण गुंतवणुकीचे महत्त्व, त्याची चौकट, गुंतवणुकीची तत्त्वे, गुंतवणूक करताना कोणत्या गोष्टींचा विचार करावा इत्यादी अनेक घटकांवर चर्चा केली आहे ज्यामुळे संपत्ती निर्माण होते आणि आपण आर्थिक स्वातंत्र्याकडे वाटचाल करतो याची खात्री होते. मग आज आपण 'कुठे गुंतवणूक करू नये?' या विषयावर चर्चा करीत आहोत हे थोडेसे आश्चर्यकारक पण गरजेचे आहे. लहानपणी पालक आणि शिक्षक नेहमी मुलांना अभ्यास कसा करावा हे सांगतात आणि पुन्हा पुन्हा सांगतात. मानवी मेंदूची मजेदार गोष्ट म्हणजे एखादी गोष्ट सतत सांगितली गेली तर ती आपले मन स्वीकारते. पण कधी कधी मुलांना काय करू नये हे सांगावे लागते आणि ते बरेचदा नेमकं त्याच गोष्टीच करतात! चांगल्या कल्पनांना वारंवार पुनरुच्चाराची गरज असते, तर वाईट कल्पना सहज मनाला भावतात.

गुंतवणुकीकडे परत येऊया. कोणत्याही मालमत्ता वर्गाबाबत मूलभूत तत्त्व एकच असते. शिस्त मदत करते, संयम फळ देतो आणि चक्रवाढीचा परिणाम विलक्षण असतो. उत्कृष्ट परतावे कायम उत्कृष्ट राहतातच असे नाही. ते बहुधा अल्पकालीन असतात. पण लोक अल्पकालीन कामगिरीने प्रभावित होतात. उलट, मध्यम परतावा सातत्याने आणि दीर्घकाळ मिळाला तर तो चमत्कार करतो. ताज्या बातम्या, 'टॉप परफॉर्मन्स' असे शब्द गुंतवणूकदारांचे लक्ष वेधतात आणि दीर्घकालीन विचार करण्याची क्षमता कमी होते. तोच प्रकार तोट्याच्या भीतीतून आणि जास्त नफा मिळविण्याच्या लालसेत दिसतो. दीर्घकालीन फायद्याचे आपण केलेले कमी मूल्यमापनच आपली सर्वांत मोठी कमतरता आहे आणि हाच दोष फसवणूक करणाऱ्यांना आपले लक्ष आणि नंतर आपली संपत्ती मिळविण्याचे साधन बनतो.

**तर मग प्रश्न असा गुंतवणूक कुठे करू नये?**

आपण हे दोन गटात विभागू शकतो नियमन नसलेले (अनरेग्युलेटेड) आणि नियमन असलेले (रेग्युलेटेड).

पहिल्या प्रकारात कोणताही नियामक (रेग्युलेटर) नसतो. आरबीआय, सेबी, पीएफआरडीए, आयआरडीए यांसारख्या संस्था संसदेतून बनविल्या गेलेल्या कायद्यांद्वारे स्थापन झाल्या आहेत आणि त्या त्यांच्या क्षेत्रावर नियंत्रण ठेवतात. म्हणजेच एखाद्या तक्रारीसाठी आपण या संस्थांकडे जाऊ शकतो. पण केवळ एखाद्या संस्थेने 'सरकारकडे नोंदणी केलेली आहे' असे सांगितले म्हणून ती वैध असेलच असे नाही. भारतातील प्रत्येक प्रायव्हेट किंवा पब्लिक लिमिटेड कंपनी सरकारकडे नोंदणीकृत असते, पण तरीही ती फसव्या योजनाच चालवू शकते.

काही दशकांपूर्वी एक योजना आली होती लोकांना 'सागवान लागवडीत गुंतवणूक करा' असे सांगितले गेले आणि भरघोस परतावा देण्याचे आश्वासन देण्यात आले. आकर्षक कल्पना, प्रसिद्ध ब्रँड, विलक्षण परतावे, या सगळ्यांनी लोकांना भुलवले. शेवटी ती योजना कोसळली. त्या झाडांचा आणि पैशांचा काहीच ठावठिकाणा लागला नाही.



सागवान कमी होते म्हणून की काय तर पुढे आली एमू आणि डुक्कर पालन योजना. फक्त नाव बदलले, पण काम करण्याची पद्धत तीच-मोठे परतावे. 'नवीन कल्पना', नियमनाचा अभाव आणि शेवट तोच: गुंतवणूकदारांचे नुकसान.

होम ट्रेड आठवतंय का? चित्रपट आणि क्रिकेट क्षेत्रातील मोठमोठ्या नावांनी त्याची जाहिरात केली होती. कंपनीचा उदय आणि पडझड दोन्ही झपाट्याने झाले आणि गुंतवणूकदार हवालदिल झाले. कोणतीही गुंतवणूक योजना जी 'हमीशीर' किंवा 'अतिशय जास्त परतावा' देण्याचे आश्वासन देते तिच्यापासून सावध राहा. लक्षात ठेवा, 'उच्च जोखीम म्हणजे उच्च परतावा' असं नेहमीच नसतं. काही वेळा त्याचा अर्थ 'संपूर्ण भांडवल गमावणे' असाही असू शकतो.

**पॉन्झी योजना:** या फसव्या गुंतवणूक योजना असतात ज्या अल्पावधीत जास्त परतावा देण्याचे आश्वासन देतात. पण, प्रत्यक्षात नव्या गुंतवणूकदारांच्या पैशातून जुन्यांना परतावा दिला जातो. नवीन गुंतवणूक थांबल्यावर योजना कोसळते आणि बहुतांश लोकांचे सर्व पैसे बुडतात.

**पिरॅमिड योजना:** पॉन्झी योजनांसारख्याच, पण यात खरे उत्पादन नसते- फक्त नवीन लोकांची भरती केली जाते. वरच्या लोकांना खालच्या लोकांच्या पैशातून परतावा मिळतो. हे गणिती दृष्ट्या अस्थिर मॉडेल आहे आणि शेवटी ते कोसळते.

आता नियमन असलेल्या क्षेत्रांकडे पाहूया. काही उत्पादने त्यांची गुंतागुंत किंवा गुंतवणूकदारांच्या उद्दिष्टांशी विसंगत असल्यामुळे टाळावी लागतात.

- विमा (इन्सुरन्स): विमा हा गुंतवणुकीचा पर्याय नाही. त्याचे काम म्हणजे अनपेक्षित घटनांमध्ये आर्थिक संरक्षण देणे. जेव्हा आपण विमा आणि गुंतवणूक एकत्र करतो, तेव्हा दोघांवरही अन्याय करतो.
- डेरिव्हेटिव्हज (डेरिव्हेटिव्ह सेंगमेंट): शेअरबाजारात प्रवेश करणारे नवीन गुंतवणूकदार लालसेने या भागात जातात. हे अत्यंत जोखमीचे आणि लिव्हरेज असलेले उत्पादन आहे जे तुमचे संपूर्ण भांडवल गमावू शकते.
- इक्विटी आणि इक्विटी म्युच्युअल फंड्स: हे 'जलद श्रीमंत होण्याचे साधन' नाही. इक्विटी दीर्घकालीन संयम आणि शिस्त बाळगणाऱ्यांना बक्षीस देते. जर तुम्ही तासागणिक बाजार पाहत असाल, तर तुम्ही गुंतवणूकदार नसून व्यापारी आहात-आणि ही सवय फक्त तणाव वाढवते, संपत्ती नाही. दीर्घकालीन रहा, फळ नक्की मिळेल.


गुंतवणूकदाराला फक्त एक गोष्ट हवी- तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता. पहिला प्रश्न हा नसावा की 'किती परतावा मिळतो?', तर 'हे उत्पादन माझ्या गरजेशी, वेळेच्या चौकटीशी आणि जोखमीच्या क्षमतेशी जुळतो का?' हा असावा. या प्रश्नाचे योग्य उत्तर मिळाल्यानंतरच गुंतवणूक करावी. ●●

● **पराग परांजपे**
गुंतवणूक तज्ज्ञ/ ९८२२७३८९०३
Think Financial Intermediary Services Pvt. Ltd.

# एकाच अस्त्राने किती वार?

मागील आठवड्यापासून शेअर बाजारातील वातावरण जऽऽरा तेजीकडे झुकते माप देणारे वाटत होते. ऐन सणावारांच्या दिवसात बाजारात परतलेली तेजी सर्वांचाच उत्साह वाढवणारी होती. सारे काही ठीकठाक सुरू असताना ट्रम्प यांचा 'डीके' (दिमाख खराब) झाला आणि पुन्हा त्यांनी आपले तेच अस्त्र उगारले. होय...पुन्हा एकदा ट्रम्प यांनी टॅरिफचे अस्त्र उगारून होत्याचे नव्हते करून टाकले आहे. यावेळी त्यांनी आपला राग चीनवर काढला आहे.

नुकतीच नोबेल शांतता पुरस्काराची घोषणा झाली. ट्रम्प यांनी या पुरस्काराची फारच आशा लावली होती. अनेक मांडलिक देश त्यांचे समर्थनही करत होते. मात्र, नोबेल समिती पक्की निघाली. निकषांच्या पलीकडे जाऊन काहीही करणार नाही, असे ठामपणे सांगत त्यांनी स्वतःचा निर्णय घेतला. ट्रम्प यांना नोबेलची हुलकावणी अतिशय जिव्हारी लागली. समाज माध्यमांवरही त्यांची खिल्ली उडवण्यात आली. या प्रकाराचे उट्टे त्यांनी आता चीनवर काढले आहे. त्यांनी चीनवर थोडे थोडके नाही तर १०० टक्के टॅरिफ लादले आहे. याआधी ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदीचा हवाला देत भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क आकारले होते पण, चीनला यामधून वगळले होते. त्यांचा हा निर्णय जगभरातील बाजारांसाठी मोठा आघात ठरतो आहे. केवळ शेअर बाजारच नव्हे तर क्रिप्टो चलनही हादरले आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलिकडील इशाऱ्याने जगातील दोन मोठ्या अर्थसत्ता, चीन आणि अमेरिकेत पुन्हा एकदा ट्रेड वॉरची घबराट निर्माण झाली आहे. ट्रम्प यांनी १ नोव्हेंबरपासून चिनी आयातींवर १०० टक्के अतिरिक्त टॅरिफ लादण्याची धमकी दिली जे सध्याच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. अशाप्रकारे येत्या काही दिवसांत अमेरिकेतील चिनी आयातींवर एकूण १३० टक्के टॅरिफचा भार पडणार आहे. याआधी चीनने दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या निर्यातीवर बंदी घातली होती. चीनच्या या निर्णयानंतर ट्रम्प यांनी चीनने दुर्मिळ खनिज निर्णयात बंदीचा निर्णय मागे घेतले नाही तर अमेरिका चिनी वस्तूंवर 'जोरदार कर' लादेल, असा इशाराही दिल्यावर अखेरीस चिनी आयातींवर १०० टक्के कराचा बोजा लादला. अशा परिस्थितीत, ट्रम्प यांच्या टॅरिफचे पडसाद शुक्रवारी अमेरिकन शेअर मार्केटमध्ये दिसून आले आणि जगातील दोन सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये पुन्हा व्यापारयुद्ध सुरू होण्याच्या भीतीने शेअर आणि क्रिप्टो बाजार आपटला. एसअ‍ॅण्डपी ५०० निर्देशांक आणि नॅसडॅकमधील एप्रिलनंतर सर्वांत मोठ्या घसरणीमुळे २.५ ट्रिलियन डॉलरचे नुकसान झाले. अमेरिकन शेअर बाजाराच्या गरंगळीत दिग्गज आयटी कंपन्यांच्या स्टॉक्सनी देखील नांगी टाकली. जगातील सर्वांत मौल्यवान कंपनी - एनव्हिडियाचे शेअर्स ४.९५ टक्के आणि एएमडी ७.७८ टक्क्यांनी आपटले. आता येणाऱ्या आठवड्यात याचे 'आफ्टर शॉक्स' भारतीय बाजारांमध्येही जाणवणार आहेत, अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ●●

● **सोनाली ठेंगडी**-७७५५९३८८२२

| | ३ ऑक्टोबर बंदभाव (रु.) | १०ऑक्टोबर बंदभाव (रु.) | उतार/ चढाव |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ८१२०७ | ८२,५०१ | +१२९४ |
| निफ्टी | २४८९४ | २५,३०० | +४९६ |
| सोने (१० ग्रॅम) | ११८०४० | १२३७१० | +५६७० |
| चांदी प्रति किलो | १५१००० | १७४००० | +२३००० |
| कच्चे तेल बॅरल | $६४.६२ | $६२.७३ | $-१.८९ |

उद्योगाच्या उगमकथा

# डेटॉल

'स्वच्छता ही आरोग्याचा दोन तृतीयांश भाग आहे' ही म्हण जीवनात खूप महत्त्वाची आहे. कारण स्वच्छता ही मानवी गरजांपैकी एक आहे. कोविड-१९ चा प्रादुर्भाव झाल्यापासून, विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आपण नियमितपणे आपले हात धुणे बंधनकारक आहे. बरं, तुम्ही असा विचार करत असाल की नियमित साबण वापरल्याने एकाच धुण्यात जंतू नष्ट होतात, बरोबर? पण तुम्ही चुकीचे आहात. कारण नियमित साबणात कोणतीही अँटिबॅक्टेरियल रसायने नसतात, तर हात धुण्याचे द्रव किंवा जंतुनाशक जेल असते.

१९३० च्या दशकात, अँटिसेप्टिक्स एकतर केंद्रित किंवा पातळ केले जात होते. केंद्रित अँटिसेप्टिक्स त्वचेच्या ऊतींना गंजणारे आणि नुकसान करणारे होते. या समस्येमुळे व्यथित झालेल्या डॉ. रेनॉल्ड्सने त्यांच्या मुलांसोबत मिळून एक उपाय विकसित केला. १९३३ मध्ये, त्यांनी लंडनच्या क्वीन चार्लोट हॉस्पिटलमध्ये डेटॉल अँटिसेप्टिक लिक्विड (एएसएल) साठी चाचण्या सुरू केल्या. डेटॉलने सामान्य अँटिसेप्टिक्सच्या अकार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित केले. संक्षारक अँटिसेप्टिक्सच्या विपरीत, डेटॉल पातळ केले तरीही प्रभावी होते, ज्यामुळे त्रास कमी झाला.

डेटॉल हे प्रथम डचिंग फॉर्म्युलेशन म्हणून आणि हात धुण्यासह वैयक्तिक स्वच्छतेसाठी विकसित केले गेले. रुग्णालयांमध्ये आणि डॉक्टरांनी आजार निर्माण करणारे बॅक्टेरिया आणि विषाणू कमी करण्यासाठी याचा वापर केला, बाळंतपणानंतर प्रसूतिपूर्व सेप्सिस रोखण्यासाठी प्रभावी सिद्ध झाले.

डेटॉलचा शोध ब्रिटिश कंपनी रेकिट अँड कोलमन (आता रेकिटचा भाग आहे) ने लावला होता आणि प्रथम १९२९ च्या सुमारास शास्त्रज्ञ डॉ. विल्यम कोलब्रुक रेनॉल्ड्स यांनी त्याची निर्मिती केली होती. जंतूंचा प्रसार रोखण्यासाठी आणि अँटिसेप्टिक आणि जंतुनाशक प्रदान करण्यासाठी डेटॉल ब्रँड १९३३ मध्ये लाँच करण्यात आला. 'डेटॉल' हे नाव स्वतः ब्रिटिश शास्त्रज्ञ लॉयड रोके यांनी शोधून काढले होते.

डॉ. रेनॉल्ड्स ज्या मूळ कंपनीत काम करीत होते ती रेकिट अँड सन्स होती. रेकिट अँड कोलमन नंतर ब्रँडचे नाव बनले. आज डेटॉल हे ब्रिटिश बहुराष्ट्रीय कंपनी रेकिट बेन्कीसर (आरबी) चे उत्पादन आहे. भारतात त्याचे नाव रेकिट बेंकीसर (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड असे आहे.



यूकेमध्ये डेटॉलच्या यशामुळे त्याचा जागतिक विस्तार झाला. १९३५ मध्ये डेटॉल ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये लाँच करण्यात आले. त्यानंतर दक्षिण आफ्रिका, भारत, कॅनडा आणि दक्षिण अमेरिकेतही ते लाँच करण्यात आले. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे डेटॉलची मागणी आणखी वाढली.

१९३६ मध्ये भारतात डेटॉलची ओळख झाली. तथापि, हळदीसारख्या पारंपरिक घरगुती उपचारांमुळे त्याची लोकप्रियता वाढण्यात अडचणी आल्या. यावर मात करण्यासाठी, डेटॉलने भारतीय डॉक्टरांशी सहकार्य करून ते लिहून दिले, ज्यामुळे हळूहळू लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला. १९४५ मध्ये, डेटॉलने भारतात एक उत्पादन कारखाना स्थापन केला, ज्याचे अंदाजे ६५ दशलक्ष वापरकर्ते होते. डेटॉलचा ब्रँड अ‍ॅम्बेसेडर भारतीय क्रिकेट आयकॉन महेंद्रसिंग धोनी आहे, ज्याला 'कॅप्टन कूल' म्हणूनही ओळखले जाते. मे २०२५ मध्ये डेटॉलच्या साबण, बॉडीवॉश आणि हँडवॉश उत्पादनांच्या श्रेणीसाठी, विशेषतः त्यांच्या आइसी कूल समर लाइनसाठी ब्रँड अ‍ॅम्बेसेडर म्हणून त्याची घोषणा करण्यात आली.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला, असे मानले जात होते की शरीराच्या असंतुलनामुळे आजार होतात. तथापि, डेटॉलने वेगळा दृष्टिकोन स्वीकारला. कंपनीला प्रगतिशील विज्ञानाचा अभिमान होता जो विचार करण्याच्या एका नवीन पद्धतीचे प्रतिनिधित्व करतो - की आजार हा आपल्या दैनंदिन जीवनात होणाऱ्या जंतूंमुळे होतो. नंतर असे आढळून आले की प्रभावी स्वच्छता पद्धतींद्वारे लाखो आजार टाळता येतात.

समाजाचे रक्षण करण्यासाठी आणि वैज्ञानिक कौशल्याचा वापर करण्यासाठी या जैविक प्रवृत्तीने प्रेरित होऊन, डेटॉलने एक निरोगी, स्वच्छ आणि सुरक्षित जग निर्माण करण्याचे ध्येय हाती घेतले.

डेटॉल उत्पादनांमध्ये डेटॉल इन्स्टंट हँड सॅनिटायझर, अँटिसेप्टिक लिक्विड, लॉन्ड्री सॅनिटायझर, मल्टीयूज स्किन अँड सरफेस वाईप्स, जंतुनाशक स्प्रे यांचा समावेश आहे.

१९३३ मध्ये जन्मलेले, डेटॉल हे डॉक्टरांसाठी शोधले गेले होते आणि बाळंतपणानंतर सेप्सिसमुळे लाखो माता आणि बाळांचा मृत्यू होत असताना त्याची प्रथम आवश्यकता होती. १९७९ मध्ये, डेटॉलने जगभरातील अधिकाधिक लोकांचे आणि अधिकाधिक ठिकाणी खरोखरच शक्तिशाली मार्गांनी संरक्षण करण्यासाठी नवीन स्वरूप सादर करण्यासाठी त्यांचे तंत्रज्ञान, ज्ञान आणि संसाधने आणखी वाढवायला सुरुवात केली. अँटिसेप्टिक द्रवपदार्थांमध्ये, डेटॉलचा बाजारपेठेत ८५ टक्क्यांहून अधिक वाटा आहे. डेटॉलचा जसजसा प्रसार होत गेला आणि संरक्षणाचे आश्वासन पूर्ण करत गेला तसतसे ते १२४ हून अधिक देशांमधील लाखो लोकांचे आवडते बनले. डेटॉल हा जागतिक स्तरावर नंबर वन अँटिसेप्टिक द्रव आहे, जो १२० हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे. त्याचा प्रवास नावीन्यपूर्णता, प्रभावी विपणन आणि लवचिकतेच्या शक्तीचा पुरावा आहे. ●●

● **प्रा. दीपक कुळकर्णी,** नागपूर
९८२२५७५२५७

रेडी रेकनर पेक्षा कमी व्यवहार

# विक्रेता आणि खरेदीदार दोघांवरही परिणाम

महाराष्ट्रात प्रत्येक मालमत्ता व्यवहार सरकारच्या रेडी रेकनर मूल्यावर (रेडी रेकनर व्हॅल्यू- आर.आर.व्ही.) आधारित असतो. हा दर महसूल व मुद्रांक विभाग दरवर्षी प्रसिद्ध करतो आणि तोच 'किमान बाजारमूल्य' म्हणून नोंदणीसाठी बंधनकारक असतो. जर मालमत्ता या मूल्यापेक्षा कमी किमतीत विकली गेली, तर त्या व्यवहारावर जास्त मुद्रांक शुल्क आणि दुहेरी आयकर परिणाम लागू होतात.

**रेडी रेकनर म्हणजे काय?**

'रेडी रेकनर' म्हणजे वार्षिक दरपत्रक (दरांचे वार्षिक विवरण). प्रत्येक क्षेत्र, वॉर्ड, मालमत्तेचा प्रकार यानुसार दर ठरवले जातात. नोंदणी शुल्क नेहमी वास्तविक विक्री किंमत किंवा रेडी रेकनर किंमत - यांपैकी जी जास्त असेल त्यावरच आकारले जाते. उदाहरण: विक्री किंमत रु. ७० लाख, रेडी रेकनर मूल्य रु. ८० लाख ? मुद्रांक शुल्क रु. ८० लाखावरच लागेल.

**विक्रेत्यावर कर परिणाम - कलम ५०सी**

आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम ५०सी नुसार, जर विक्री किंमत रेडी रेकनर मूल्यापेक्षा कमी असेल, तर मुद्रांक मूल्यच 'विक्री किंमत' मानली जाते आणि त्यावर भांडवली नफा मोजला जातो.

**सवलत मर्यादा:** जर फरक १० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर वास्तविक किंमत ग्राह्य धरली जाते. पण फरक १० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास रेडी रेकनर किमतीवर कर मोजावा लागतो.

**उदाहरण:** विक्री किंमत रु. ७० लाख, रेडी रेकनर रु. ८० लाख- फरक रु. १० लाख (१४.२८ टक्के)- विक्रेत्यावर रु. ८० लाखांवर कर.

**खरेदीदारावर कर परिणाम - कलम ५६(२)**

जर खरेदीदाराने मालमत्ता रेडी रेकनर दरापेक्षा कमी किमतीत विकत घेतली आणि फरक रु. ५०,००० व १० टक्क्यांपेक्षा अधिक असेल, तर तो फरक 'इतर उत्पन्न' म्हणून खरेदीदाराच्या नावावर करपात्र ठरतो.

**उदाहरण:** खरेदी रु. ७० लाख, रेडी रेकनर रु. ८० लाख- फरक रु. १० लाख?खरेदीदारावर रु. १० लाखांचा कर.

**रेडी रेकनर मूल्य जास्त वाटल्यास उपाय**

करदात्याला जर रेडी रेकनर दर अवास्तव वाटत असेल, तर कलम ५०सी(२) नुसार विभागीय मूल्यांकन अधिकारी (डी.व्ही.ओ.) कडे स्वतंत्र मूल्यांकन मागवता येते. डी.व्ही.ओ. चे मूल्यांकन कमी असेल तर तेच अंतिम मानले जाते.



हा उपाय नागपूर, नाशिक, ठाणे, पुणे अशा ठिकाणी उपयुक्त ठरतो, जिथे रेडी रेकनर दर कधी कधी बाजारभावांपेक्षा जास्त असतात.

**कायदेशीर तरतुदींचा सारांश**

| परिस्थिती | संबंधित कलम | परिणाम |
|---|---|---|
| कमी किमतीत विक्री | कलम ५०सी | विक्रेत्यावर कर रेडी रेकनर किमतीवर |
| कमी किमतीत खरेदी | कलम ५६(२)(x) | खरेदीदारावर फरक करपात्र |
| रेडी रेकनर अवास्तव वाटल्यास | कलम ५०सी(२) | डी.व्ही.ओ. मूल्यांकन |
| आधीचा करार आणि बँक पेमेंट | प्रोवायझो ५० सी व ५६(२)(x) | सवलत उपलब्ध |
| सवलत मर्यादा | १०% | फरक =१०% असल्यास कर नाही |

**आधीचा करार असल्यास सवलत**

जर विक्रीपूर्वी विक्रीसाठी करार झाला असेल आणि त्यावेळी काही रक्कम चेक किंवा आर.टी.जी.एस. द्वारे घेतली गेली असेल, तर नोंदणी दिवशी नव्हे तर कराराच्या तारखेचा रेडी रेकनर दर ग्राह्य धरता येतो. हे कलम ५०सी आणि ५६(२)() मधील तरतुदीमुळे शक्य होते.

**व्यवहाराचे व्यावहारिक परिणाम**

- **जास्त मुद्रांक शुल्क:** नोंदणी विभाग रेडी रेकनर मूल्यावर शुल्क घेतो.
- **दुहेरी करभार:** विक्रेता व खरेदीदार दोघांवर कर लागतो.
- **तपासणीचा धोका:** कमी किमतीचे व्यवहार ए.आय.एस/टी.आय.एस. डेटामध्ये दर्शवले जातात.
- **बँकिंग अडचणी:** बँका रेडी रेकनर दरावर मूल्य मोजतात; त्यामुळे लोन कमी मिळू शकते.
- **भविष्यातील विक्रीतील करवाढ:** कमी किमतीत घेतलेल्या मालमत्तेच्या विक्रीवेळी भांडवली नफा जास्त मोजला जातो.

**महाराष्ट्रातील उदाहरण**

मोजा-अजनी, नागपूर येथील भूखंडाचा रेडी रेकनर दर रु. २५,००० प्रति चौ.मी. आहे.

विक्री रु. २२,००० दराने झाली.

- मुद्रांक शुल्क रु.२५,००० दरावर.
- विक्रेत्याचा कर रु.२५,००० दरावर.
- खरेदीदारावर रु. ३,००० फरक करपात्र.

म्हणून कमी किमतीत व्यवहार केल्याने दोघांनाही नुकसान.

**निष्कर्ष :** सरकारी रेडी रेकनर मूल्यापेक्षा कमी किमतीत मालमत्ता विकणे किंवा खरेदी करणे हे वरवर फायद्याचे दिसते, पण प्रत्यक्षात त्यातून जास्त मुद्रांक शुल्क, दुहेरी कर आणि आयकर तपासणीचा धोका निर्माण होतो. महाराष्ट्रात नोंदणी, मुद्रांक आणि आयकर प्रणाली डिजिटल व पारदर्शक झाली आहे. सर्व पेमेंट्स बँकिंग मार्गाने करा आणि तज्ज्ञ सल्लागाराचा सल्ला घ्या. ●●

● **अ‍ॅड. हितेश प्रवीण पारसे,**
नागपूर. ९०९६३३२३५३
कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार

● संयोजक : **अभिजित वर्तक**- ९४२२९२३२०१ ●

# एमजीएममध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय पालि परिषदेचे आयोजन

## परिषदेचे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज आणि भारतीय व विदेशी भाषा संस्थेच्या माध्यमातून मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर आणि बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी 'पालि : जन-जन की बोली' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता रुक्मिणी सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन सत्रात केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे डॉ.प्रफुल्ल गडपाल हे उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.

या परिषदेस एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत. गौतम बुद्धांनी पालि भाषेच्या माध्यमातून आपले तत्वज्ञान सांगितले. पालि भाषा त्याकाळी सर्व सामान्य लोकांची होती. या भाषेवर संशोधन व्हावे तसेच नवीन पिढीला पालि भाषेचे महत्व कळावे, या उद्देशाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

## एचपी कॅटेगिरींमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले

मुंबई : ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे, यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज समाविष्ट आहे.ग्रोमॅक्सच्या दमदार आणि इंधन-कार्यक्षम डिझेल इंजिन्स तसेच जागतिक दर्जाच्या गिअरबॉक्स तंत्रज्ञानावर चालणारे हे नवे ट्रॅक्टर उच्च परफॉर्मन्ससाठी ओळखले जातात आणि वापरण्यास सोपे आहेत. हे ट्रॅक्टर बागायती शेती, सुपारी शेती, इंटर-कल्टिव्हेशन, पडलिंग आणि हॉलज यांसारख्या विविध शेती गरजांसाठी उपयुक्त ठरणार आहेत.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने कर्नाटक सरकारसोबत केला सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज समग्र शिक्षण कर्नाटक (शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग), कर्नाटक सरकार यांच्यासोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या कराराचा उद्देश इयत्ता ९ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्याला अधिक बळकटी देणे हा आहे.या धोरणात्मक भागीदारीचे उद्दिष्ट अकादमिक शिक्षण आणि उद्योग यांतील दरी कमी करणे, विद्यार्थ्यांना वाहन तंत्रज्ञानातील प्रत्यक्ष शिकण्याचा अनुभव देणे, तसेच त्यांना जबाबदार आणि भविष्याभिमुख नागरिक म्हणून घडविणे आहे. ही पुढाकार वाढत्या कुशल मनुष्यबळाच्या गरजेला प्रतिसाद देताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करेल.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून सस्टेनेबिलिटी रिपोर्ट सादर

बेंगळुरू, १३ ऑक्टोबर २०२५- टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आपला सर्वसमावेशक सस्टेनेबिलिटी रिपोर्ट २०२५ जारी केल्याची घोषणा केली आहे, ज्यासह पर्यावरणीय स्थिरता आणि भारतातील अद्वितीय विकासात्मक क्षेत्रासाठी डिझाइन करण्यात आलेल्या शाश्वत गतीशीलता सोल्यूशन्सप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली आहे. कर्नाटक सरकारचे माननीय वन, पर्यावरण आणि पर्यावरण मंत्री श्री. ईश्वर खंद्रे यांच्या हस्ते या अहवालाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी कॉर्पोरेट प्लॅनिंग अँड ग्रीन फील्ड प्रोजेक्टचे उपव्यवस्थापकीय संचालक श्री. स्वप्नेश मारू; मुख्य संप्रेषण अधिकारी, वरिष्ठ उपाध्यक्ष व राज्य व्यवहार प्रमुख श्री. सुदीप दळवी आणि टीकेएमचे इतर प्रमुख दिग्गज उपस्थित होते. यामधून भारताच्या कार्बन तटस्थता आणि शाश्वत उत्पादन उत्कृष्टतेकडे परिवर्तनामध्ये उत्प्रेरक म्हणून कंपनीची भूमिका अधिक स्पष्ट झाली.

## वीस टक्के आध्यत्म व ऐंशी टक्के समाज सेवा हे स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राचे सूत्र



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ ऑक्टोबर

वीस टक्के आध्यत्म व ऐंशी टक्के समाज सेवा हे स्वामी समर्थ अध्यात्मिक केंद्राचे सूत्र आहे त्यानुसार मराठावड्यात झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करीत आहोत. असे असे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील गुरुपुत्र श्री चंद्रकांतदादा यांनी सोयगाव येथील अमृततुल्य हितगुज सोहळ्यात सांगितले.

सोयगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती समोर दि.८ बुधवार रोजी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील गुरुपुत्र श्री चंद्रकांतदादा यांचा अमृततुल्य हितगुज सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी आध्यत्मिक ज्ञान,कुलाचार,सण उत्सव,विवाह संस्कार, ध्यान धारणा,योगासने हे जितकं महत्वाचे आहे त्यापेक्षा संकटात पाठीमागे उभं राहणे तितकेच महत्वाचे आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील अतिवृष्टी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आपण फुल न फुलांची पाकळी म्हणून मदत देत आहोत.असे प्रतिपादन चंद्रकांत दादा यांनी यावेळी केले.सोयगाव तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत किट वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोयगाव परिसरातील स्वामी समर्थ भक्त परिवारातील सेवेकरी मंडळीने परिश्रम घेतले.

## डॉ. प्रणामसागर महाराज आचार्यश्रीचा २५ व्या संयम दिवस राजाबाजार येथे उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर: दीक्षा हा केवळ वस्त्रांचा त्याग नाआचार्यश्रीचे २५ व्या संयम दिवसाचे ही, तर तो 'संयमाच्या जीवनातील नवीन जन्म' आहे. एका सामान्य मानवाकडून श्रमण (मुनी) होण्याचा हा प्रवास आहे, असे प्रतिपादन आचार्यश्री डॉ. प्रणामसागर यांनी केले. ते २५ व्या दीक्षा दिवस निमित्त हिरकाका प्रांगणात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

त्यांनी सांगितले की, दीक्षा घेऊन संयमाचे कवच धारण केल्यामुळेच ते आज २५ वर्षे धर्ममार्गावर स्थिर राहू शकले आहेत. संयम हेच मुनींच्या जीवनाचे 'परम तप' आहे. दीक्षा ही वैयक्तिक साधना असली तरी, मुनींचे संयमी जीवन संपूर्ण समाजाला प्रेरणा देते. समाजात राहणार्या प्रत्येक व्यक्तीला शिकवते की, 'सुख' हे वस्तूंच्या उपभोगण्यात नाही, तर इच्छांवर नियंत्रण 'ठेवण्यात आहे. यावेळी आचार्यश्रींनी ९ ऑक्टोंबर रोजी झालेल्या भक्तांबर दिवसाचे आयोजक यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करैन सर्वाना आर्शिवाद दिले. कार्यकमाचे सुत्रसंचालन वंदना विनोद कासलीवाल, अनुष'टाचार्य कपिलभैया पाटणी इंदौर यांनी केले तर प्रास्ताविक चातुर्मास समितीचे कार्याध्यक्ष संजय पहाडे यांनी केले. तर स्वागतपर भाषन पचायत अध्यक्ष महावीर पाटनी यानी केले यावेळी उपस्थित अतिथींकडुन दिप प्रज्वलन करैन व भगंताच्या फोटोला माल्यार्पन करण्यात आले. आचार्यश्रींचे पादपक्षालन करण्याचे सौभाग्य उर्मिला प्रमोदकुमार 'ठोले, श्रीमती.सुनंदा कैलासचंदजी पाटणी यांना मिळाले, आचार्यश्रीचे २५ व्या संयम दिवसाचे औचित्य साधुन २५ गुरैभ्ताकडुन ग्रंथ भेट करण्यात आले. सर्व उपस्थित भाविकांना परम गुरै भक्त दिपककुमार,किरणकुमार,रविकुमार,सुनिलकुमार,सुर्यकुमार,पहाडे परिवार यांच्याकडुन महाप्रसाद देण्यात आला. तसेच अरिहंतनगर ,बालाजीनगर,राजाबजार,कुवारफल्ली,हडको,चिंमामणी कॉलनी,भक्तांबर हिलहिंग ग्रुप,स्वाध्याय ग्रुप,उल्कानगरी महिला मंडळ आदीच्या वतीने आचार्यश्रीच्या चरणी अर्ग चढविण्यात आले.

# तत्कालीन केंद्र सरकारने कोणताही विचार न करता राज्याची पुनर्रचना केली - चंद्राबाबू नायडू

अमरावती, १३ ऑक्टोबर : जेव्हा राज्याचे विभाजन झाले तेव्हा राजधानी नव्हती. तत्कालीन केंद्र सरकारने राजधानी कुठे असेल हे स्पष्ट न करता राज्याचे विभाजन केले. त्याच दिवशी, आम्ही राज्याच्या भविष्यासाठी जगात काहीतरी अद्वितीय निर्माण करण्याचा निर्णय घेतला. आम्ही ठरवले की विजयवाडा आणि गुंटूर दरम्यान राजधानी असणे चांगले राहील. आम्ही आधीच एक संकल्पना तयार केली होती, असे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू म्हणाले, सोमवारी सकाळी अमरावती येथे सीआरडीए (राजधानी प्रदेश विकास प्राधिकरण) कार्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हे विधान केले.

पुढे ते म्हणाले राजधानी अमरावती प्रदेशातील शेतकऱ्यांनी केलेले बलिदान कधीही विसरले जाणार नाही. त्यांनी आठवण करून दिली की त्यांनी त्यांची दुर्दशा पाहिली आणि रस्त्यावर उतरून निषेध केला. त्यांनी आश्वासन दिले की राजधानी प्रदेशाचा सर्व प्रकारे विकास केला जाईल.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आज खूप आनंदाचा दिवस आहे. सर्वप्रथम, सीआरडीए इमारतीचे उद्घाटन झाले आहे. अमरावतीच्या शेतकऱ्यांना पहिल्यांदाच लँड पूलिंग अंतर्गत जमीन देण्याचा इतिहास आहे. येणाऱ्या काळात सरकारी आणि खाजगी इमारती बांधल्या जातील.

राजधानीच्या बांधकामासाठी शेतकरी स्वेच्छेने जमीन देण्यासाठी पुढे आले आहेत. जगाच्या इतिहासात, एवढी मोठी जमीन फक्त अमरावतीमध्येच संपादित करण्यात आली आहे. यापूर्वी, जेव्हा हाय-टेक सिटी बांधली जात होती, तेव्हा मी त्यांना माझे स्वप्न सांगितले, परंतु त्यांनी माझी थट्टा केली. आम्ही हैदराबादमध्ये ५,००० एकरवर विमानतळ बांधला. जेव्हा शेतकऱ्यांनी विमानतळासाठी जमीन मागितली तेव्हा त्यांनी ती लगेच दिली. ज्यांनी तिथे जमीन खरेदी केली आहे त्यांनी उत्तम काम केले आहे, असे चंद्राबाबू नायडू म्हणाले.

चंद्राबाबू नायडू यांनी राजधानीतील शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी त्यांच्या तीन वरिष्ठ नेत्यांवर सोपवली आहे. ते म्हणाले की ते ही जबाबदारी केंद्रीय मंत्री पेम्मासनी चंद्रशेखर, मंत्री नारायण आणि आमदार श्रवण कुमार यांना देत आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना या तीन नेत्यांशी कोणत्याही समस्यांवर चर्चा करून उपाय शोधण्याचा सल्ला दिला. मुख्यमंत्र्यांनी नेत्यांना शेतकऱ्यांसोबत नियमित बैठका घेण्याचे आदेशही दिले.

## अमरावती फडणवीसांच्या हस्ते दोन लाख कुटुंबांना किराणा व साडी-चुडी वाटपाचा शुभारंभ



अमरावती, १३ ऑक्टोबर - आज, सोमवारी अमरावती दौऱ्यावर असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर २ लाख कुटुंबांना किराणा वाटप आणि भगिनींना साडी-चुडी वाटप उपक्रमाचा भव्य शुभारंभ करण्यात आला.

हा उपक्रम आ. रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या संकल्पनेतून, युवा स्वाभिमान पार्टी व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. दिवाळीच्या सणानिमित्त शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब व कष्टकरी जनतेसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून, राज्यातील गावागावांत व शहरांतील प्रत्येक कुटुंबाच्या घरी हा किराणा पोहोचविण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी या वाटपाची सुरुवातही झाली आहे.

कार्यक्रमास अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनीलभाऊ राणा, तसेच भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्व ओलिसांच्या सुटकेचे आम्ही स्वागत करतो - पंतप्रधान मोदी



जेरुसलेम, १३ ऑक्टोबर : इस्त्रायल आणि हमास यांच्यात गाझा पट्टीत सुमारे दोन वर्षे सुरू असलेला संघर्ष आता थांबला आहे. हमासने सोमवारी युद्धविराम अंतर्गत इस्त्रायली २० जिवंत बंदिवानांची सुटका केली आहे. करारानुसार, इस्त्रायलेने सुमारे १,९०० पेक्षा जास्त पॅलेस्टिनी कैद्यांना देखील मुक्त केले आहे. आता या संपूर्ण प्रक्रियेबद्दल आणि इस्त्रायली बंदिवानांच्या सुटकेविषयी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान मोदींचे म्हणाले, दोन वर्षांहून अधिक काळ बंदीत वसलेल्या बंदिवानांची सुटका करण्याचा हा क्षण आम्ही स्वागत करतो. त्यांची स्वातंत्र्य ही त्यांच्या कुटुंबांनी दाखवलेल्या धैर्याची, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अखंड शांतता प्रयत्नांची आणि पंतप्रधान नेतन्याहू यांच्या दृढ संकल्पाची श्रद्धांजली आहे. आम्ही या प्रदेशात शांतता आणण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना पाठिंबा देतो. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायलमध्ये घुसखोरी करून नरसंहार घडविला, ज्यामध्ये सुमारे १,२०० लोक ठार झाले होते. तसेच, होणाऱ्या हल्ल्यादरम्यान सुमारे २५० लोकांना बंदिवान बनवले गेले होते आणि त्यांना गाझात नेले गेले होते. त्यानंतर इस्त्रायलेने हमासविरुद्ध युद्ध सुरू केले. गाझातील स्थानिकी आरोग्य अधिकारी म्हणतात की, या संघर्षात ६७,००० पेक्षा अधिक पॅलेस्टिनी नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत. युद्धविराम करारानंतर, सोमवार सकाळी ट्रम्प इस्त्रायलमध्ये पोहोचले. त्यांनी इस्त्रायली संसद नेसेटला संबोधित केले. तसेच, ते या भागात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शांति शिखर परिषदेत सह-अध्यक्ष म्हणून कार्य करतील.

करारानंतर, अमेरिका आणि मिसरचे राष्ट्राध्यक्ष हे दोघेही गाझात दोन वर्षे चाललेल्या संघर्षाला समाप्त करण्याच्या दृष्टीने जागतिक शांति परिषद आयोजित करत आहेत.

## सिल्लोड येथे शिवसेनेने जोरदार शक्तिप्रदर्शन करीत वाढविला प्रचाराचा नारळ



सिल्लोड प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका समोर ठेवून युवकांनी मजबूत संघटन करावे. मजबूत बुद्ध बांधणी करा महिलांचे संघटन करा. वाडी वस्तीवर जाऊन संपर्क वाढवा मतदान याद्या कुठल्याही बुथवर दगा फटका बसणार नाही याची दक्षता घ्या. जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद वर शिवशेनेचा भगवा फडकवण्यासाठी सज्ज व्हा. असे आव्हान अब्दुल सत्तार यांनी त्यांनी त्यांच्या सिल्लोड सोयगाव स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे फुगले.

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मतदारसंघात सर्वच जागा लाडू आणि प्रत्येक जागेवर विजय मिळव असा विश्वास अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला. रविवार रोजी दि १२ सिल्लोड येथील शिवसेना भवन प्रांगणात आमदार अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना पक्षाचा प्रचाराचा नारळाचा प्रारंभ व तसेच नवनियुक्त शिवसेना तालुका अध्यक्ष केशवराव पाटील तायडे यांचा सत्कार व सोहळा पार पडला. याप्रसंगी उपस्थिती त्यांना मार्गदर्शन करताना अब्दुल सत्तार बोलत होते

कार्यक्रमात अब्दुल सत्तार व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पाटील गाडे. तालुकाप्रमुख केशवराव पाटील तायडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास दाभाडे. किशोर अग्रवाल देविदास लोखंडे श्रीराम महाजन. सुदर्शन अग्रवाल देविदास पालोदकर नंदकुमार सहारे रामदास पालोदकर. मनोज झावर धरम सिंग चव्हाण. महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पुष्पाताई गव्हाणे. उपजिल्हाप्रमुख दुर्गाताई पवार माजी नगराध्यक्ष राजश्री निकम आदीसह विविध गावातील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## महावितरणमधील ग्राहकसेवा कार्यालयांच्या पुनर्रचनेला शहरात प्रारंभ

### कर्मचाऱ्यांना कामाचा ताण कमी, कामकाजात सुसूत्रता

छत्रपती संभाजीनगर : महावितरण अंतर्गत थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेला छत्रपती संभाजीनगर परिमंडलात सोमवारी (१३ ऑक्टोबर) प्रारंभ झाला. महावितरणमध्ये उपविभाग व शाखा कार्यालयांद्वारे नवीन वीजजोडणी, मासिक वीजबिल, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, तांत्रिक बिघाडांची दुरुस्ती, वीजबिलांची थकबाकी वसुली, वीजहानी कमी करणे आदी कामे करण्यात येतात. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना एकाच वेळी १० ते १२ प्रकारची कामे करावी लागत आहे. ही रचना सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे व त्यावेळच्या ग्राहकसंख्येनुसार करण्यात आली होती.

पूर्वीच्या रचनेचा परिणाम गेल्या काही वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि ग्राहकसेवेवर देखील झालेला दिसून येत आहे. त्यामुळे सरसकट कामांचा ताण कमी करून निवडक कामांची जबाबदारी द्या अशी मागणी गेल्या १० वर्षांपासून अभियंता व कर्मचाऱ्यांच्या संघटनांद्वारे करण्यात येत होती. व्यवस्थापनाने त्यासाठी विशेष समिती स्थापन करून कर्मचारी संघटनांशी वेळोवेळी चर्चा करून पुनर्रचनेचे प्रारूप तयार केले आहे. प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांच्या पुनर्रचनेवर भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे शहरी, ग्रामीण व दुर्गम भागांतील ग्राहकसंख्या व भौगोलिक क्षेत्रानुसार संबंधित उपविभाग व शाखा कार्यालयांची फेररचना करण्यात आली आहे. सोबतच ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

अशी आहे पुनर्रचना : महावितरणच्या विभाग कार्यालयांमध्ये कोणताही बदल न करता त्यात विभागीय देखभाल व दुरुस्ती पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या १० सदस्यीय पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. विभागातील सर्व उपकेंद्र व ३३ केव्ही वीजवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम या पथकाकडे राहणार आहे. तसेच प्रत्येक विभागात सध्या अस्तित्त्वात सर्व उपविभागांचे महसूल व देयके तसेच देखभाल व दुरुस्ती अशी विभागणी करण्यात येईल. म्हणजे एका विभागात सध्या चार उपविभाग कार्यालय असल्यास पुनर्रचनेत देखभाल व दुरुस्ती तसेच महसूल व देयके असे प्रत्येकी दोन उपविभाग राहतील. देखभाल व दुरुस्ती उपविभागातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी वीजयंत्रणेची देखभाल व दुरूस्तीचे कामे, नवीन वीजयंत्रणा उभारणे, वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे निवारण आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कामे करतील. तर महसूल व देयके उपविभागातील अभियंते, कर्मचारी नवीन वीजजोडणी, अचूक बिलिंग, बिलिंग तक्रारींचे निवारण, थकबाकी वसुली ही कामे करणार आहेत.

## अभिनेते अजय पूरकर साकारणार खलनायक; 'अभंग तुकाराम' चित्रपटात 'मंबाजी'च्या भूमिकेत दिसणार



छत्रपती संभाजीनगर - नायकाप्रमाणे क्रूर खलनायकही चित्रपटांत गाजलेत! याआधी सकारात्मक भूमिकेत दिसलेले कलाकार आता नकारात्मक पात्र साकारताना दिसत आहेत. या यादीत आता अभिनेते अजय पूरकर यांचा समावेश झाला आहे. आगामी 'अभंग तुकाराम' या चित्रपटात 'मंबाजी' या नकारात्मक रूपात आपल्याला ते दिसणार आहेत. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'अभंग तुकाराम' चित्रपट ७ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येणार आहे. पॅनोरमा स्टुडिओज ही नामांकित निर्मिती संस्था या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. चित्रपटाचे निर्माते कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक असून सहनिर्माते मुरलीधर छतवानी, रवींद्र औटी आहेत.

संत तुकोबांचे वाढते प्रस्थ पाहून ज्यांच्या ज्यांच्या पोटात दुखत होते त्यात मंबाजी हे आघाडीवर होते. काही ना काहीतरी कुरापत काढायची आणि संत तुकोबांना छळायचे हे त्यांचे नित्याचेच काम होते. 'मंबाजी' यांचा नीचपणा एवढा होता की तुकोबांना गुरुस्थानी मानणाऱ्या बहिणाबाई यांनी त्याचे वर्णन *विंचवाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगी* असे केलेले आहे.

'मंबाजी' या आपल्या खलनायकी भूमिकेबद्दल बोलताना अजय पूरकर सांगतात, 'याआधीच्या माझ्या बऱ्याच भूमिका सकारात्मक प्रवृत्तीच्या होत्या. आजवरच्या माझ्या प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं आणि आता नाण्याच्या दुसऱ्या बाजूला येऊन एक वेगळा प्रयत्न या चित्रपटातून मी केला आहे. ही व्यक्तिरेखा कमाल ताकदीची आहे. कलाकार म्हणून स्वीकारलेली ही व्यक्तिरेखा मला खूप महत्त्वाची वाटते. कलाकार म्हणून माझ्या प्रत्येक भूमिकेमध्ये मी वेगळेपण कसं आणू शकतो हे महत्त्वाचं आहे. 'अभंग तुकाराम' चित्रपटातील या भूमिकेच्या निमित्ताने मला ही संधी मिळाली.

'अभंग तुकाराम' चित्रपटाची कथा आणि संवाद प्रसिद्ध लेखक योगेश सोमण यांचे आहे. दिग्पाल लांजेकर यांनी पटकथा आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. चित्रपटाचे छायांकन संदीप शिंदे यांचे आहे.

## पैठण पंचायत समिती १८ गण आरक्षण जाहीर



तभा वृत्तसेवा

पैठण दि १३ :- पैठण पंचायत समिती निर्वाचक १८ जागेचे गण आरक्षण सोडत उप विभागीय अधिकारी नीलम बाफना ,तहसीलदार ज्योती पवार, गटाविकास अधिकारी मनोरामा गायकवाड यांच्या उपस्थितीत पंचायत समिती सभागृहात लहान मुलांच्या हस्ते चिठ्या काढून पैठण तालुक्यातील पंचायत समिती गट आरक्षण घोषित कारण्यात आले.

चितेगाव एस.सी. महिला रांजणगाव खुरी ओपन सर्वसाधारण,बीडकीन ओपन सर्वसाधारण,निलजगाव ओबीसी महिला,आडूळ ओपन महिला,बालानगर ओपन महिला,पाचोड ओपन महिला,एकतुनी ओपन सर्वसाधारण,दावरवाडी ओबीसी महिला,नांदर ओपन सर्वसाधारण,ढोरकिन ओपन महिला,लोहगाव ओपन महिला,पिंपळवाडी पिराची ओबीसी सर्वसाधारण,मुधलवाडी एस.सी पुरुष,विहामांडवा ओपन सर्वसाधारण,केकत जळगाव ओपन सर्वसाधारण,नवगाव ओबीसी सर्वसाधारण,चांगतपुरी ओपन महिला. असे घोषित कारण्यात आले. या प्रक्रियेसाठी अमोल पाखरे महसूल सहायक , रेवनाथ खेडकर सह शिक्षक , गणपत मिटकर सह शिक्षक, दादासाहेब गटकळ , सोनवणे दशरथ खराद, निसर्गाध,, इम्रान शेख आदींनी परिश्रम घेतले.


**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६)२२१७२७, E-mail:-mchhingoli@gmail.com

विभागः- लेखा जा.क्र.नपहि १८६२/२०२५-२६ दिनांक १३/१०/२०२५

**ऑनलाईन ई-निविदा सुचना २०२५-२६**

माझी वसुंधरा ४.० अर्तगत निधीमधुन प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहुन Miyawaki plantation at Kamgar Hotel to Ice factory at M.C Hingoli अंदाजीत रक्कम ५१,५३,४७०/- याकामासाठी ईपीएफ पंजीकृत अनुभवी नर्सरीधारक सेवाभावी संस्था/कंपनी यांचे मार्फत ई-निविदा मागविण्यात येत असुन, सदरील कामासाठी को-या ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १३/१०/२०२५ रोजी १२.३० वाजले पासुन ते दिनांक २०/१०/२०२५ रोजी ६.०० वाजे पर्यत उपलब्ध असतील. प्राप्त ई-निविदा दिनांक २३/१०/२०२५ रोजी वाजल्यानंतर गुत्तेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. एक किंवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे.

ई-निविदा संबंधीत अटी व शर्ती कार्यालयीन वेळेमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी

नगर परिषद, हिंगोली

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# तालिबानच्या विश्वासार्हतेचा मुद्दा

मुस्लिम जगतात युद्धे, लढाया, वांशिक संघर्ष, गृहयुद्धे आणि रक्तपात झाला नाही, असे एकही दशक २० व्या शतकात दृष्टिपथास पडणार नाही. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तानचा दारुण पराभव झाल्यानंतर विजयी अमेरिका, ब्रिटनच्या नेतृत्वातील मित्र देशांनी विशाल अशा ऑटोमन साम्राज्याची शकले केली. पाश्चिमात्य देशांच्या या कृतीमुळे जगभरातील मुस्लिमांमध्ये संतापाची लाट उसळली. कधीकाळी शक्तिशाली असलेल्या ऑटोमन साम्राज्याचे तुकडे तुकडे झालेले पाहून खिलाफत चळवळीला प्रारंभ झाला. त्याचे पडसाद जगभर उमटले. हा कालखंड आणि भारताच्या फाळणीचा काळ वगळता १९२४ ते १९६० पर्यंत युरोप, मध्यपूर्व, दक्षिण आशिया आणि आफ्रिका खंडातील मुस्लिम देशांमध्ये बऱ्यापैकी शांतता नांदत होती. काबुल, तेहरान, बगदाद, सना या शहरांमध्ये पाश्चिमात्य संस्कृती रुळली होती. मुस्लिम जगतात अशांततेला प्रारंभ झाला तो पॅलेस्टाईन आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने. इस्लामिक दहशतवादाचा उदय येथूनच झाला. १९६७ मध्ये इस्रायल आणि अरब देशांमध्ये युद्धाचा भडका उडाला. १९७९ मध्ये इराणमध्ये धार्मिक क्रांती झाली, तर रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केल्याने दीर्घकालीन संघर्षाला प्रारंभ झाला. दरम्यानच्या काळात १९६५ आणि १९७१ या काळात भारत-पाकिस्तान यांच्यात युद्ध भडकले होते. तिकडे इराणमध्ये पहेलवी घराण्याची सत्ता उलथून लावत सत्तेवर आलेल्या रुहुल्लाह खोमेनी यांनी शरियतचे कायदे लागू केले. १९८० मध्ये इराक-इराण यांच्यात लक्षावधी नागरिकांचे बळी घेणारे युद्ध सुरू झाले, जे आठ वर्षे चालले. मुस्लिम देशांमध्ये सुरू झालेले हे संघर्ष दहशतवादाच्या उदयाचा काळ ठरला. भारताचा शेजारी असलेल्या अफगाणिस्तानात तर गृहयुद्ध भडकले होते. रशियन आक्रमणाच्या विरोधात अमेरिका, पाकिस्तान आणि अरब देशांच्या मदतीने दहशतवाद्यांचे तांडेच्या तांडे तयार झाले. कंदहारमध्ये कट्टर जिहादी मानसिकता असलेल्या मुल्ला ऊर्फ मोहम्मद उमरने तालिबान संघटनेची स्थापना केली. थोड्याच काळात गुरिल्ला युद्धात निष्णात असलेल्या तालिबानने कंदहार, हेरतसह अर्ध्या अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळविले.

या मोहिमांमध्ये तालिबानला पाकिस्तान, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात हे देश तर हक्कानी गट आणि ओसामा बिन लादेनच्या अल-कायदाचे मनुष्यबळ आणि आर्थिक सहकार्य मिळाले. काबुलवर चढाई करण्यापूर्वी कंदहार येथे मुल्ला उमरने बोलावलेल्या बैठकीत आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काबुल ताब्यात आल्यानंतर तालिबानचा वापर भारताविरोधात करण्याचा पाकिस्तानचा कुटिल डाव होता. पण, तसे काही घडले नाही. शस्त्रसज्जता झाल्यानंतर ऑगस्ट १९९६ मध्ये काबुलच्या दिशेने कूच करीत तालिबानने प्रथम जलालाबाद घेतले आणि काबुलला वेढा दिला. यावेळी अफगाणिस्तानचे अध्यक्ष मोहम्मद नजिबुल्लाह आणि त्यांच्या बंधूने युनोच्या दूतावासात आश्रय घेतला होता. पुढे तालिबानने काबुलवर ताबा मिळविला. नजिबुल्लाह आणि त्यांच्या भावाचे गोळ्यांनी चाळणी झालेले मृतदेह आढळून आले. तालिबान्यांनी क्रौर्याची सीमा पार करीत दोघांचे मृतदेह ट्रकला मागे बांधून काबुलच्या रस्त्यावरून फरफटत नेले. नंतर चौकात आणून विजेच्या खांबावर लटकविले. तालिबानच्या या कृत्याचा जगभरातून निषेध करण्यात आला. तालिबानच्या सत्तेला पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरात यांनी ताबडतोब अधिकृत मान्यता दिली. तर, अमेरिका, रशिया, भारत, इराण यांनी तालिबानला मान्यता दिली नाही. युनोनेही तालिबानला नाकारले. तेथे खरोखर महिला आणि मुलांचे जिणे नरकासमान झाले होते. तालिबानच्या आश्रयाने राहणाऱ्या ओसामा बिन लादेनने न्यू यॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर भीषण दहशतवादी हल्ला चढविला. या हल्ल्याने जागतिक राजकारणाची दिशाच बदलून गेली. या हल्ल्याने अमेरिकेचे नाक कापले गेले. हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या आणि अफगाणिस्तानात लपलेल्या लादेनला सोपविण्याची मागणी अमेरिकेने केली. पण, अहंकारी मुल्ला उमरने ही मागणी फेटाळली. एक काळ असा होता की रशियाला शह देण्यासाठी तालिबानला अमेरिका आणि पाकिस्ताननेच पोसले. तीच तालिबान संघटना मुजोर झाली.

त्यानंतरच्या काळात अमेरिकेने हल्ला करून अवघ्या तीनच महिन्यांत तथाकथित तालिबानची इस्लामिक राजवट उलथून टाकली. मुल्ला उमर फरार झाला. पण, तालिबानने विरोध करणे सुरूच ठेवले. तब्बल दोन दशके अफगाणिस्तान गृहयुद्धात भरडला गेला. या काळात लक्षावधी नागरिकांचा मृत्यू झाला. दोन दशकांच्या संघर्षानंतरही काहीच ठोस हाती न लागल्याने अमेरिका, नाटोने अफगाणिस्तानातून काढता पाय घेतला. तालिबानला पुन्हा संधी मिळाली आणि मे २०२१ मध्ये पुन्हा एकदा तालिबान्यांनी काबुलच्या दिशेने कूच केले. अध्यक्ष अश्रफ गनी देश सोडून पळाले आणि तालिबानने काबुलचा ताबा घेतला.

हा काळ भारतासाठी कसोटीचा होता. गनी सरकारच्या काळात अफगाणिस्तानात भारताने अनेक विकास प्रकल्प हाती घेतले होते. रस्ते तयार करणे, रुग्णालये बांधणे आणि धरणांच्या निर्मितीपासून तर अगदी संसद भवन बांधून देण्याचे काम भारताने केले. तालिबान सत्तेवर येताच सर्वांत जास्त आनंद झाला तो पाकिस्तानला. भारत आता दोन्ही बाजूंनी ठेचला जाणार आणि अफगाणिस्तानात विविध प्रकल्पांवर कार्यरत असलेले अधिकारी, तज्ज्ञ, दूतावासातील अधिकारी मारले जाणार, या स्वप्नात आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कर होते. काबुल तालिबानच्या ताब्यात आल्यानंतर भारतासाठी पहिल्या पाच-सहा महिन्यांचा काळ कसोटीचा होता. बोटावर मोजता येतील एवढेच शीख, हिंदू काबुलमध्ये उरले होते. जिवाच्या भीतीने तेही भारतात परतले. १९७० मध्ये अफगाणिस्तानात हिंदू आणि शिखांची संख्या दोन लाखांच्या आसपास होती. आज ती फक्त दोनशेच्या आसपास आहे. या पृष्ठभूमीवर २०१९ मध्ये भारताने ३७० कलम रद्द केल्याने पाकिस्तानचा तिळपापड झाला. तालिबान सरकार स्थिरस्थावर झाले की भारताविरोधात कारवाया करण्यासाठी अफगाणी भूमीचा उपयोग करायचा, असे मनसुबे पाकिस्तान आखत होता. पण, भारताने पारंपरिक परराष्ट्र नीतीत कालानुरूप बदल करताना वेट अ‍ॅण्ड वॉच धोरणाचा अवलंब केला. २०२३ पासून भारत-तालिबान यांच्यात पडद्याआड चर्चा सुरू झाली. नोव्हेंबर २०२४ मध्ये भारताचे राजनैतिक अधिकारी जे. पी. सिंग यांनी काबुलमध्ये अफगाणिस्तानचे कार्यकारी संरक्षण मंत्री मुल्ला मुहम्मद याकुब यांची भेट घेतली. हा याकुब म्हणजे तालिबानचा संस्थापक मुल्ला उमरचा पुत्र. जानेवारी २०२५ मध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दुबईत मुत्तकी यांची भेट घेतली होती. दरम्यान, भारताकडून अफगाणिस्तानला मदत सुरूच होती. गहू, औषधांचा पुरवठा करण्याबरोबरच भूकंप आला असता अफगाणिस्तानात मदत घेऊन पोहोचणारा भारत हा पहिला देश होता. त्यामुळे केवळ इस्लामच्या नावावर तालिबानचा भारताविरुद्ध वापर करण्याचे पाकिस्तानचे मनसुबे पार धुळीस मिळाले. ४० वर्षांपासून सुरू असलेल्या गृहयुद्धामुळे तेथील जनतेचे हाल झाले. भारताने गरजू अफगाणींना मदत करण्याचे धोरण सतत राबविले. २०२१ मध्ये काबुलमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर भारताच्या भूमीवर पाय ठेवणारे अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आमिर खान मुत्तकी हे पहिलेच तालिबानी नेते. अलिकडच्या सहा दिवसांच्या भेटीत त्यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेण्याबरोबरच उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील देवबंद मदरशालाही भेट दिली. तेथे त्यांनी भारताचे अफगाणिस्तानशी रुहानी (आत्मीय) संबंध असल्याचे विधान केले. १९९० पूर्वी अफगाणिस्तानातील विद्यार्थी, विचारवंत, धार्मिक नेते देवबंद येथे शिक्षणासाठी येत असत. येथील इस्लामिक विचार आणि शिक्षणाचा प्रसार अफगाणिस्तानात जाऊन करीत असत. पण, गृहयुद्धामुळे ते थांबले होते. मुत्तकी यांच्या भेटीनंतर दोन्ही देशांत पुन्हा धार्मिक आणि सांस्कृतिक संबंध स्थापित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. असे असले तरी भारतानेही अफगाणिस्तानच्या शासकांना मर्यादितच ठेवले आहे. भारताने अजूनही काबुलमधील तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही. परंतु, राजनैतिक चर्चा-भेटी सुरू झाल्या हे चांगले झाले. अर्थात, मूलतत्त्ववादी विचारांवर विश्वास असलेल्या तालिबानवर किती विश्वास ठेवायचा हे भारतालाही टप्प्याटप्प्याने ठरवत राहावे लागणार आहे हेच खरे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# खुदा मेहेरबान, तो..!

'खुदा मेहेरबान, तो गधा पहेलवान'! ही म्हण पाकिस्तानसाठी बरोबर लागू ठरत आहे. पाकिस्तानची स्थिती काय आहे हे साऱ्या जगाला माहीत आहे. पण, सध्या पाकिस्तानवर 'खुदा' म्हणजे अमेरिका मेहेरबान आहे असे दिसते. चीनने पाकिस्तानला शस्त्रसज्ज करण्याचा जणू निर्धार केला असताना, आता अमेरिकाही यात सहभागी झाली आहे. अमेरिकेने पाकिस्तानला अत्याधुनिक अशी 'ॲमराम' जातीची प्रक्षेपणास्त्रे विकण्याचा निर्णय घेतला आहे. भारतासाठी हा निर्णय काहीसा धक्कादायक असा राहणार आहे. अमेरिकेच्या भारतविरोधी निर्णयात हा एक मोठा टप्पा मानला जातो. यासंदर्भात गदारोळ सुरू झाल्यानंतर अमेरिकेने एक स्पष्टीकरण देत असा नवा कोणताही निर्णय झाला नसल्याचे म्हटले आहे. याचा दुसरा अर्थ म्हणजे विद्यमान व्यवस्थेतच या प्रक्षेपणास्त्रांचा पुरवठा पाकिस्तानला केला जाणार आहे.

**रेथॉनचे उत्पादन** : अमेरिका युक्रेनला तोमहॉक प्रक्षेपणास्त्र देण्याबाबत विचार करीत असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी प्रसारित झाले होते. तोमहॉकचे उत्पादन करणाऱ्या रेथॉन कंपनीने हे ॲमराम म्हणजे ॲडव्हान्स मीडियम रेंज एअर टू एअर मिसाईल तयार केले असून अमेरिकेने ते पाकिस्तानला विकत देण्याचा निर्णय घेतला आहे. तोमहॉकचे एक प्रक्षेपणास्त्र काही कोटींचे आहे तर ॲमराम हे प्रक्षेपणास्त्रही किमती असल्याचे मानले जाते.

**एफ-१६ साठी** : पाकिस्तानजवळ एफ-१६ जातीची ५२ विमाने आहेत. अमेरिकेने ही विमाने काही वर्षांपूर्वी पाकिस्तानला विकली आहेत. या विमानांची देखभाल करण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेने मोठी रक्कम मंजूर केली होती. आता ॲमराम विकण्याचा जणू बोनस या देशाला दिला जात आहे. ॲमराम प्रक्षेपणास्त्रे एफ- १६, एफ-२२ व एफ-३५ या तीन जातींच्या विमानांमध्ये वापरली जाऊ शकतात. यातील एफ-१६ विमान पाकिस्तानजवळ आहे.

**इतिहास बालाकोटचा** : २०१९ च्या बालाकोट संघर्षात पाकिस्तानने भारताचे मिग-२१ विमान पाडले होते, त्यासाठी एफ-१६ चा वापर करण्यात आला होता आणि ॲमरामच्या प्रक्षेपणास्त्राचा वापर करीत पाकिस्तानने भारताचे हे विमान पाडण्यात यश मिळविले होते. आता या प्रक्षेपणास्त्रांचा मोठा साठा पाकिस्तानला देण्याचा निर्णय अमेरिकेच्या सरंक्षण मंत्रालयाने घेतला असल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे.

**ऑपरेशन सिंदूर** : मे महिन्यात झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानने चिनी विमानांचा वापर केला होता. यात जेएफ-१० व जेएफ-१७ थंडर यांचा प्रामुख्याने समावेश होता. या विमानांमध्ये पीएल-१५ या प्रक्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला होता. या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता १५० किलोमीटरची असली तरी चीनने स्वत:साठी विकसित केलेले ३०० किलोमीटर मारक क्षमता असलेले प्रक्षेपणास्त्र पाकिस्तानला दिले होते. त्याचाच वापर त्याने भारताच्या विरोधात केला होता असे म्हटले जाते. मात्र ही प्रक्षेपणास्त्रे एफ-१६ जातीच्या विमानात वापरली जाऊ शकत नाहीत. पाकिस्तानने ही बाब लक्षात घेत अमेरिकेकडे ॲमराम प्रक्षेपणास्त्रांची याचना केली होती असे म्हटले जाते. यासाठी पाकिस्तानचे हवाई दल प्रमुख बाबर सिद्धू यांनी जुलै महिन्यात अमेरिकेला भेट दिली. आता त्यांच्या मागणीनुसार ॲमराम प्रक्षेपणास्त्रे पाकिस्तानला विकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता १६० किलोमीटर असल्याचे मानले जाते.

**फायर ॲण्ड फरगेट** : फायर ॲण्ड फरगेट हे या प्रक्षेपणांस्त्राचे वैशिष्ट्य मानले जाते. वैमानिक हे प्रक्षेपणास्त्र सोडून नंतर दुसरीकडे लक्ष देऊ शकतो. आणि मग या प्रक्षेपणास्त्रात असलेले रडार त्याला त्याच्या नियोजित लक्ष्यावर घेऊन जाते. अचूक नेम धरण्यासाठी ते प्रसिद्ध आहे. अमेरिकेच्या या निर्णयाने पाकिस्तानला भारताविरोधात मुजोरी करण्यात ताकद मिळणार आहे. किंबहुना त्यासाठीच त्याला हे प्रक्षेपणास्त्र विकण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतला असल्याचे मानले जाते. ट्रम्प यांनी एकापाठोपाठ एक असे भारतविरोधी निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे.

**तोमहॉक आणि ॲमराम** : अमेरिका युक्रेनला तोमहॉक हे लांब पल्ला असणारे प्रक्षेपणास्त्र देण्याबाबत विचार करीत आहे. याचा वापर रशियाविरुद्ध केला जाणार हे स्पष्ट आहे. तसेच पाकिस्तानला दिले जाणारे ॲमराम प्रक्षेपणास्त्र भारताविरोधात वापरण्यासाठी दिले जात आहे हेही स्पष्ट आहे. आम्ही ही विमाने पाकिस्तानला स्वसंरक्षार्थ दिली हे अमेरिका सांगत होती, तरी बालाकोट युद्धात एफ-१६ चा वापर भारताविरोधात झाला हे सर्वांना माहीत आहे. आता ॲमरामचा वापर भारताविरोधात केला जाणार नाही हे अमेरिकेने पुढे मागे सांगितले तरी त्यांचा वापर भारताच्या विरोधातच होणार हे ठरले आहे.

**भारतासमोरील पर्याय** : चीन व अमेरिका या दोन्ही देशांनी पाकिस्तानला जणू शस्त्रसज्ज करण्याचा निर्णय घेतला असल्यासारखे दिसत असताना भारताजवळ रशिया वा फ्रान्स यांच्याकडून अत्याधुनिक लढाऊ विमाने विकत घेण्याचा पर्याय शिल्लक राहणार आहे. रशियाचे सुखोई-५७ हे लढाऊ विमान अमेरिकेच्या एफ-१६ विमानाच्या बरोबरीचे मानले जाते. मात्र हे विमान खरेदी करण्याच्या वाटाघाटीत काही समस्या असल्याचे म्हटले जाते. फ्रान्सकडून रफाल विमाने घेण्याचा निर्णय भारताने अगोदरच घेतला आहे. याला रशियाच्या सुखोई-५७ जातीच्या विमानाची साथ मिळाल्यास भारताची हवाई मारक क्षमता निश्चितच वाढेल असे समजते. मात्र या विमानाचे तंत्रज्ञान भारताला देण्यास रशिया तयार नसल्याचे मानले जाते.

**चिनॉकला उत्तर** : केवळ दोन महिन्यांपूर्वी ऑगस्ट महिन्यात पाकिस्तानने झेड-१० एमई जातीचे लढाऊ हेलिकॉप्टर आपल्या ताफ्यात सामील करण्याचा निर्णय घेतला व तो लागू केला. भारताने अमेरिकेकडून घेतलेले चिनॉक हे लढाऊ हेलिकॉप्टर आपल्या लष्करात सामील केले आहे. त्याला उत्तर म्हणून पाकिस्तानने हे हेलिकॉप्टर आपल्या ताफ्यात सामील केले आहे. पाकिस्तानला चीनकडून हे हेलिकॉप्टर मिळाले असावे असे मानले जाते. कारण, पाकिस्तानजवळ स्वत: ते विकसित करण्याची क्षमता नाही. मात्र, अमेरिका व चीन या दोन्ही देशांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करून टाकले आहे यात शंकाच नाही.

**चवथा- 'ए'** : पाकिस्तानचे अस्तित्व अल्ला, आर्मी व अमेरिका या तीन 'ए'वर असल्याचे म्हटले जात असे, ते पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यात आणखी एका 'ए'ची भर पडली आहे. नवा ए- म्हणजे ॲमराम.

**आणि बगराम** : ॲमरामप्रमाणेच चर्चा सुरू आहे ती अफगाणिस्तानातील बगराम हवाई तळाची. चीनच्या सीमेपासून १०० किलोमीटरवर असलेला बगराम हवाई तळ अमेरिकेने काही वर्षांपूर्वी उभारला होता, तो परत मिळविण्याचा प्रयत्न राष्ट्रपती ट्रम्प करीत असताना, भारतासह काही देशांनी अमेरिकेच्या या प्रयत्नांना विरोध दर्शविला आहे. वास्तविक बगराम हवाई तळ अमेरिकेला परत मिळणे भारताच्या हिताचे मानले जाते. याने अमेरिका व चीन यांच्यातील तणाव अधिक वाढला असता. अमेरिका व पाकिस्तान संबंधातही कटुता तयार झाली असती. भारताने या वादापासून दूरच राहावयास हवे होते असे मानले जात असताना, भारतानानेही आपला विरोध नोंदविला आहे. याने तालिबान राजवट सुखावणार असली तरी या राजवटीवर कोणताही विश्वास ठेवता येणार नाही असा तालिबानचा इतिहास आहे. बगराम आणि ॲमराम दोन्ही अमेरिकेचे. एक हवाई तळ आणि दुसरे हवाई प्रक्षेपणास्त्र. भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान या त्रिकोणात बगराम आणि ॲमरामचा कसा व किती प्रभाव पडतो हे लवकरच दिसणार आहे.

## वेध

अनिल फेकरीकर

# तस्करीतील वाहन कायम जप्त व्हावे!

झटपट श्रीमंत व्हायचे असेल तर तस्करी करावीच लागेल, अशाच स्वरूपाचा फॉर्म्युला बहुतांश लोकांनी स्वीकारला आहे. तस्करीमुळे मूठभर गुन्हेगारांच्या समूहाचा फायदा होत असला तरी बहुसंख्य लोकांचे दूरगामी नुकसान यात आहे. मात्र त्याची पर्वा कुणालाही नाही. प्रत्येक जण केवळ स्वत:चा विचार करून मोकळा होत आहे. यामुळे खरोखरच राष्ट्राची प्रगती होईल का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. नागपूर जिल्ह्याचा अभ्यास करता सुगंधित तंबाखूची तस्करी, गोधनाची तस्करी, रेतीची तस्करी सुरूच आहे. आता या तस्करीवर आळा बसावा, असे अनेकांना मनापासून वाटते. पण कायदा आडवा येतो. महाराष्ट्रात सुगंधित तंबाखूवर शासनाने प्रतिबंध लावला आहे. मात्र मध्यप्रदेशात हाच सुगंधित तंबाखू खुलेआम विकला जातो. परिणामी नागपुरात सुगंधित तंबाखू हा पूर्णत: मध्यप्रदेशातून तस्करीच्या रूपाने आयात केला जातो. यात झारीतील शुक्राचार्यांचाही सहभाग असतोच. पण त्या सुगंधित तंबाखूचे सेवन करणारे तर आपले मरण जवळ करीत आहे ना, त्याचे काय? शिवाय महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदाही लागू आहे. पण तिथेही कायद्यातील पळवाटा आडव्या येतात. परिणामी गाईंना पकडून गोशाळेत टाकतात आणि वाहन सुपूर्द नाम्यावर सोडतात. पुन्हा तेच वाहन गोधनाच्या तस्करीसाठी वापरले जाते. तस्करी ही राष्ट्रविरोधी कृती आहे. म्हणून तस्करी रोखण्यासाठी प्रशासनाला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. त्यानुसार कुठल्याही तस्करीत वापरले जाणारे चारचाकी वाहन कायम सरकार दरबारी जप्त करून त्यांचा तीन महिन्यांच्या आत लिलाव केला जावा. त्यातून जो काही पैसा येईल, त्याचा उपयोग गोशाळेतील चारा पाण्यावर खर्च केला जावा. जेव्हा अशी कृती युद्धपातळीवर सुरू होईल तेव्हा तस्करी करण्याचे स्वप्नही गुन्हेगार पाहणार नाहीत. पण वर्तमान परिस्थिती खूपच विचित्र आहे. गाईंना पकडून गोशाळेत टाकले जाते, गुन्हेगारांना अटक करून त्यांनाही तातडीने कोर्टाच्या आदेशाने जामिनावर सोडले जाते अन् वाहन दोन चार आठ दिवस ठेवत सुपूर्दनाम्यावर दिले जाते. आता त्या तस्करांचे काय बिघडले, ते तर पुन्हा अधिक प्रमाणात हे झालेले नुकसान भरून काढतात. म्हणूनच गुन्हेगार म्हणतात, 'आज जेल, कल बेल और परसो फिरसे खेल' हा असुरी आनंद व्यक्त करून ते प्रशासनाला आव्हानच देतात. हा सर्व प्रकार माणुसकीला आणि भूतदयेला काळिमा फासणारा आहे. पण कायद्यात तशी तरतूद असल्याने प्रामाणिक पोलिस काहीही करू शकत नाही. अशा सर्व स्थितीचा विचार करून आता विधिमंडळाने कायद्यातील पळवाटा दूर करून या महाराष्ट्रातून तस्करी हा प्रकारच संपविण्यासाठी एक पाऊल टाकावे.

मध्यप्रदेशातून सुगंधित तंबाखू आणि गोधनाची तस्करी नरखेड, काटोल, केळवद, सावनेर, खापा, खापरखेडा, पारशिवनी, देवलापार, रामटेकमार्गे नागपुरात केली जाते. नंतर त्यांची विल्हेवाट लावणारी कार्यक्षम यंत्रणा तातडीने कामाला लागते. या स्थितीत सज्जन म्हणवून घेणारे केवळ पाहण्याचेच काम करू शकतात. ही हतबलता आता थांबावी. संपूर्ण जग जैविक शेतीकडे वळले आहे. पण आपण क्षुल्लक लाभासाठी जैविक शेतीचा मूळ स्रोत गाईंनाच संपविण्याचा संकल्प सोडला की काय, अशीच कृती करीत आहोत. रसायनयुक्त कृषी उत्पादनामुळे घरोघरी कर्करोगाचे रुग्ण वाढत आहे. त्यावर जैविक शेती हा रामबाण उपाय आहे. पण आपल्याला कर्करोगाचे वाढलेले प्रमाण चालते, मात्र गोधनाची तस्करी रोखण्यासाठी कठोर कायदे करण्याची गरज वाटत नाही, असे का व्हावे यावरही चिंतन आवश्यक आहे. तस्करी कुठल्याही स्वरूपात असली तरी त्यात होणारी राष्ट्रहानी पाहता वापरले जाणारे वाहन कायम सरकार दरबारी जप्त करायलाच हवे. शिवाय त्यातील गुन्हेगारांना जामीन मिळणार नाही, अशीही तजवीज कठोरतेने करायला हवी. आज ग्रामीण भागातील गोधन संपल्यात जमा आहे. हळूहळू ते नामशेष होईल अन् पुढच्या पिढीला गाई पाहायच्या झाल्यास त्या चित्राच्या रूपात दाखवाव्या लागतील. वेगाने होत असलेली गाईंची कत्तल संपूर्ण मानवजातीसाठी कर्दनकाळ ठरली आहे. या समस्येकडे आता मानवीय भूमिकेतून पाहावे अन् रामबाण तोडगा काढावा, अशीच अपेक्षा.

९८२२४६८६६०

## कानोसा

अमोल पुसदकर

# भारतीय मानसिक आरोग्याचे तत्त्वज्ञान

नुकताच १० ऑक्टोबरला ''वर्ल्ड मेंटल हेल्थ डे'' जागतिक मानसिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आलेला आहे. ज्या देशांमध्ये हा मानसिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आला, त्यांची विचारसरणी ही मानवाला शरीर मानणारी आहे. परंतु, आपल्या ऋषिमुनींनी मनुष्याच्या शरीराचा विचार करताना त्याच्या मन, बुद्धी, भावना यांचाही सुद्धा विचार केलेला आहे. आमच्या ऋषिमुनींना हे माहीत होते की, मनुष्य म्हणजे शरीर, मन, बुद्धी, भावना आहे. त्यामुळे या सर्वांचेच संतुलन आरोग्यासाठी आवश्यक आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी सुद्धा जे ''एकात्म मानव दर्शन'' सांगितले आहे, त्यामध्ये सुद्धा मनुष्याच्या शरीर, मन, बुद्धी आणि भावना यांचा विचार करण्यास सांगितलेले आहे. मनुष्य म्हणजे जर शरीर असेल, तर शरीराला अन्न, वस्त्र, निवारा या त्याच्या मूलभूत गरजा दिल्यास तो आनंदी आणि स्वस्थ राहायला पाहिजे. परंतु, असे होताना दिसत नाही. आज सरकार दोन रुपये किलो तांदूळ देते की, जेणेकरून कोणीही उपाशी राहू नये. त्याचे पोट भरले पाहिजे. राहायला घर बांधून देते, घरकूल देते, सरकारी इस्पितळांमध्ये नि:शुल्क उपचारांची व्यवस्था केली जाते. अनेक संस्था नि:शुल्क कपड्यांचे वाटप सुद्धा करतात. मनुष्याला ढोबळमानाने शरीर मानून त्याला आनंदी करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू असतात. परंतु, ज्यांच्याजवळ हे सर्व आहे म्हणजे राहायला घर आहे, घालायला कपडे आहेत, खायला उत्तम अन्न आहे असे सर्वच लोक आनंदी आहेत का? त्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम आहे का? तर असे लक्षात येते की, अशाही लोकांच्या जीवनात आनंद नाही, मानसिक शांती नाही, सुख-समाधान नाही. एखादा गरीब माणूस सुद्धा आनंदी राहू शकतो आणि एखादा श्रीमंत माणूस सुद्धा दु:खी राहू शकतो. आनंद हा पैशाने विकत मिळाला असता, तर भारतातील आणि जगातील सर्व पैसेवाले लोक आनंदी राहिले असते. परंतु, एखादी व्यक्ती झोपडीत सुद्धा आनंदी असू शकते आणि एखादा मनुष्य महालात बसून सुद्धा दु:खी राहू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे ''राजास जी महाली सौख्ये कधी मिळाली, ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या.'' संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे ''मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण'', ''छोटे मनसे कोई बडा नहीं होता, और हारे मनसे कोई खडा नहीं होता.''

भारतीय संस्कृतीने फक्त आध्यात्मिक तत्त्वज्ञानच नव्हे, तर मानसिक संतुलन आणि आंतरिक शांती देणारी जीवनपद्धती सुद्धा दिलेली आहे. पाश्चिमात्य मानसशास्त्रात जे आज मानसिक आरोग्य (मेंटल हेल्थ) म्हणून ओळखले जाते, ते आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये हजारो वर्षांपूर्वी स्पष्ट केले गेले आहे. आयुर्वेदामध्ये सांगितले आहे की-



**''प्रसन्नात्मेन्द्रियमनः स्वस्थ इत्यभिधीयते'' (सुश्रुत संहिता)**

म्हणजे शरीर, इंद्रिये, मन आणि आत्मा प्रसन्न असतील, तरच मनुष्य खरोखर 'स्वस्थ' असतो. हेच मानसिक आरोग्याचे खरे लक्षण आहे. भगवद्‌गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात,''समत्वं योग उच्यते.'' समत्वभाव म्हणजे आनंद-दु:ख, लाभ-हानी, यश-अपयश यात मन स्थिर ठेवणे. आजच्या काळातील ''तणावाचे व्यवस्थापन'' (स्ट्रेस मॅनेजमेंट) म्हणजे गीतेतील हाच समत्वभाव होय. पतंजलींच्या योगसूत्रानुसार, ''योगश्चित्तवृत्ती निरोध:.'' मनातील अस्थिर विचारांचे नियंत्रण म्हणजे योग. ध्यान, प्राणायाम आणि आसन या साधनांनी मनाला शांती व स्थैर्य मिळते. उपनिषदात सांगितले आहे की ''मन: प्रसादो धर्म:,'' म्हणजे मनाचा प्रसन्नभाव म्हणजे धर्म आणि सुखाचे मूळ होय.

''सत्य असत्यासी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता'' आज समाजामध्ये वावरताना अनेक ठिकाणी सत्याशी तडजोड करावी लागते. त्यामुळे मनामध्ये अस्थिरता, असंतोष निर्माण होतो. नोकरी, कार्यालयामध्ये काम करीत असताना साहेबांनी एखादी चुकीची गोष्ट म्हटली, तरी आपल्याला मान डोलवावी लागते. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. त्यामुळे, जे मोठे अधिकारी आहेत, ते जे काही बोलतील, त्याला सत्य म्हणावे लागते. ज्ञान असूनही त्याचा उपयोग नाही, कला असूनही त्याचा उपयोग नाही. अशीही परिस्थिती असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनामध्ये उद्वेग, निराशा, चिंता निर्माण होते. मानसिक अस्वस्थतेचे हेच मूळ कारण आहे. या अस्वस्थतेमुळे जगातील लाखो लोकांना झोप येत नाही. त्यांना झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. पश्चिमात्य विचारसरणी मनुष्याला शरीर मानते. समजा एखादा मनुष्य असेल, त्याला गुलाबजाम आवडत असेल, तर त्याला म्हटलं की, या खोलीत तू बस, तुला खव्याचे स्वादिष्ट गुलाबजाम खायला घालतो, फक्त अट एकच आहे, की मी तुला या खोलीतच कोंडून ठेवीन, तुला बाहेर जाऊ देणार नाही, तर थोड्या वेळाने आपण बंदिस्त आहोत, कोंडलेले आहोत, आपले स्वातंत्र्य हिरावून घेतलेले आहे, या भावनेने त्याचे मन दुखेल व त्याला दिलेला गुलाबजाम त्याला बेचव वाटायला लागेल. माणूस म्हणजे काही जनावर नाही की ज्याला दोन रट्टे मारल्यावर, सुद्धा त्याच्या समोर जे ठेवले आहे, ते तो नि:शंकपणे खात राहील. कारण आपण जगण्यासाठी खातो, खाण्यासाठी जगत नाही.

चांद्रयान-३ मध्ये आपण पाहिले की शेकडो शास्त्रज्ञ, कर्मचारी डोळ्यात प्राण आणून विक्रम रोव्हर चंद्रावर उतरतो की नाही, याची प्रतीक्षा करीत होते. हे सर्व करीत असताना, त्यांनी अनेक दिवस १६ तासांपेक्षा अधिक काम केले होते. त्यांना त्यांच्या तहान-भुकेची जाणीव नव्हती. फक्त त्यांच्यासमोर एकच ध्येय होते चांद्रयान-३ चे चंद्राच्या पृठभागावर उतरणे. यावरून असे लक्षात येईल, की तहान-भुकेच्या पलीकडे सुद्धा काही गोष्टी असतात. जीवनाची सार्थकता हा सुद्धा भारतीय संस्कृतीने दिलेला विचार आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, अमेरिकेतल्या एखाद्या शेतकऱ्याला सांगितले की, अमुक एका पहाडावर खूप मोठ्या प्रमाणावर सोने आढळते. तर तो कदाचित तेवढा पहाड चढून जाईल. परंतु, त्याला सांगितले की, त्या पहाडावर एखादा मोठा सिद्धी प्राप्त तपस्वी तपश्चर्या करीत बसलेला आहे, तर तू त्याच्या दर्शनासाठी जातोस का? कदाचित तो जाणार नाही. परंतु, तेच जर एखाद्या भारतीय शेतकऱ्याला सांगितले, तर तो म्हणेल एवढ्या मोठ्या पहाडावर जाऊन सोने आणण्यापेक्षा, मी तर माझ्या शेतातच सोने उगवू शकतो. परंतु, त्या तपस्वी साधूच्या दर्शनासाठी मात्र मी नक्कीच जाईन. त्याच्या दर्शनाने, मार्गदर्शनाने माझ्या जीवनाचे सोने नक्कीच होईल. पाश्चिमात्य आणि भारतीय विचारसरणीचा हा फरक आहे. शाळांमध्ये शिकणाऱ्या छोट्या मुलांपासून, तर कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नोकरदारांपर्यंत सर्वांनाच आता मानसिक चिंता, भय, तणाव, अनिद्रा यांचा सामना करावा लागत आहे. अशा सर्व परिस्थितीत द्वेष आणि मत्सर यांचा त्याग करणे, मनामध्ये समाधान ठेवणे, जे पाहिजे त्यासाठी प्रयत्न करणे, परंतु यश आणि अपयश हे ईश्वरावर सोडून देणे आवश्यक आहे. ''मानसिक आरोग्य हा वैश्विक मानवी अधिकार आहे'' ही २०२५ यावर्षीची मानसिक आरोग्याची संकल्पना आहे. अशा परिस्थितीत भारतीय तत्त्वज्ञान, आमचे धर्मग्रंथ यांचा आधार घेतल्यास व त्याप्रमाणे जीवनरचना केल्यास, भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला मानसिक आरोग्य लाभू शकेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-११

सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५

### हिंदुत्वाच्या जये निनादित

हिंदुत्वाच्या जये निनादित पुनश्च भू-स्वर्लोक करा  
नगरी, ग्रामी, जनी, काननी स्वत्वाचा आलोक भरा ॥

पुन्हा एकदा दाहि दिशांना चौ पुरुषार्थे व्याप्त करा  
मनामनातुन दिव्य आपुली धर्मज्योत प्रदीप्त करा  
क्षात्रबलाने दमवा दुर्जन, निर्भय अवघे लोक करा ॥

दीन, दरिद्री, गिरिजन, हरिजन अवघे अपुले बंधू रे  
त्यांस्तव कैसे सुकले अपुल्या स्नेहरसाचे सिंधू रे?  
जनगण हा तर प्राण आपुला पाचामधला एक खरा ॥

भिन्न असू द्या भाषा अपुली, भिन्न दिसू द्या वरचे वेष  
भारत-भूचे पुत्र सर्वही, रंक असो वा असो धनेश  
कोटि स्वरातुन एक गीतिका एकत्वाची मुखी धरा ॥

ज्या धर्माने लौकिकास या अलौकिकाचा स्पर्श दिला  
अन् मनुजाच्या जीवनगीता मुक्तीचा स्वर सापडला  
त्या धर्माची ध्वजा केशरी उंच नभी बिनधोक धरी ॥

गीत- **सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

## वाचक पत्रे

### तरुणाईच्या बळावर महासत्ता होऊ शकतो?

जगाच्या केंद्रस्थानी सध्या जेन झी पिढी आहे. जेन झी म्हणजे झुमर्स. म्हणजे १९९७ ते २०१२ च्या दरम्यान जन्मलेली मुले-मुली. या पिढीने अनेक देशांमध्ये कसे सत्तांतर घडवले याच्या जोरदार चर्चा सुरू आहेत. त्यात कौतुकच जास्त केल्याचे आढळते. युवाशक्तीच्या बळावर कोणताही देश विकासाची स्वप्ने पाहू शकतो. भारत तर विश्वगुरू होण्याची महत्त्वाकांक्षा राखून आहे. तथापि वैचारिक परिपक्वतेअभावी आणि ते ज्यांना नेते मानतात त्यांचे प्रभावशाली नियंत्रण नसेल तर ही पिढी भरकटत जाण्याचा आणि त्यांनी छेडलेले कोणतेही आंदोलन दिशाहीन होण्याचा मोठा धोका कोणीही नाकारणार नाही. अशी पिढी रस्त्यावर उतरली तरी सरकारी मालमत्ता भक्ष्यस्थानी पडते, जी नागरिकांच्या करातून उभी राहते. नेपाळ हे त्याचे सध्याचे ज्वलंत उदाहरण आहे. काठमांडूचे महापौर बालेन यांनी, लोकांनी शांतता राखावी, असे आवाहन केले आहे. पण विध्वंस तर घडून गेला आहे. त्यामुळे आवाहन अर्थहीन ठरू शकेल. बालेन शाह यांनी नेपाळचे नेतृत्व करावे असे युवांना वाटते. नेपाळमधील युवांचा संताप अनाठायी नव्हता. पण आंदोलकांवर कोणाचेही नियंत्रण राहिले नव्हते, नेपाळच्या विध्वंसाचे जे वृत्त प्रसिद्ध होत आहे ते या अर्थाने कमालीचे अस्वस्थ करणारे आहे. शासकीय कार्यालयांसह अनेक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त आहेत. तुरुंगातून कैदी फरार आहेत. नेपाळ हा देश विकासाच्या रांगेत किमान पन्नास वर्षे मागे गेला आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

आपल्या भारत देशातही समाजमाध्यमांवरील तथाकथित अनेक प्रभावकांची म्हणजे इन्फ्लुएन्सर्सची वैचारिक प्रगल्भता चर्चेचा मुद्दा ठरू शकतो. मग त्यांना मानणाऱ्यांकडून त्यापेक्षा वेगळी अपेक्षा करता येऊ शकेल का, हा प्रश्न निर्माण होतो. वैचारिक समाजच विकासाचा मार्ग प्रशस्त करीत असतो. भारत तर हा तरुणांचा देश मानला जातो आणि याच तरुणाईच्या बळावर महासत्ता होऊ शकेल अशी आशा सातत्याने व्यक्त होत असते. जेन झी पिढी ताकदवान आहे आणि ते बदल घडवू शकतात हे अनेक देशांमध्ये अधोरेखित झाले आहे. तो बदल नकारात्मक घडवायचा की सकारात्मक या प्रश्नाचे सक्रिय उत्तर सर्वांनी मिळून शोधायला पाहिजे आणि धडा नेपाळने घालून दिला असे म्हणणे सयुक्तिक ठरू शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### उत्साहात साजरी करूया दिवाळी

शरद ऋतूतील शारदीय नवरात्र, दसरा आणि कोजागरीचा उत्सव झाला की दिवाळीचे वेध लागलेले असतात. मुलांच्या सुट्या, बोनस, भेटवस्तू, फराळ, फटाके वगैरे गमतीचे भाग आपण साजरे करतोच परंतु महत्त्वाचा मुद्दा असा की, घराची साफसफाई, स्वच्छता ही परंपरा, आध्यात्मिक शुद्धीकरण, लक्ष्मीला अपेक्षित सुशोभित स्थानाची योजना, जुन्या निकामी गोष्टींचे विसर्जन, नवीन ऊर्जेला सकारात्मकतेचे कोंदण असणे नक्कीच गरजेचे आहे. त्यासाठी वास्तूच्या स्वच्छतेचा योजनापूर्वक आराखडा बनवून नवीन ऊर्जा प्रस्थापित करावी व या सणाच्या आनंदाचा उपभोग घ्यावा. पूरग्रस्त, गरिबांना मदत करून त्यांनाही आपल्या आनंदात सहभागी करावे कारण दीपावली म्हणजे फक्त दिवे हा विषय नसून मनाची व घराची शुद्धता असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### चंदन चोरी प्रकरणातील एक आरोपी ताब्यात; कार आणि आठ हजारांचे चंदन जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील कल्याणनगर परिसरातील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या निवासस्थानी झालेल्या चंदन चोरीप्रकरणाचा तपास पोलिसांनी उकलला असून, छत्रपती संभाजीनगर परिसरातून एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीकडून कारसह सुमारे आठ हजार रुपयांचे चंदन जप्त करण्यात आले.

२४ सप्टेंबर रोजी मध्यरात्री न्यायाधीश निवासस्थानाच्या गार्डनमधील चंदनाचे झाड तोडून चोरी करण्यात आली होती. याप्रकरणी भास्कर सदाशिव कांबळे यांच्या फिर्यादीवरून नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास नवा मोंढा पोलीस ठाण्याचे पथक तसेच स्थानिक गुन्हा शाखेकडे सोपविण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात विसावा कॉर्नर, उड्डाणपूल, शिवाजी महाविद्यालय परिसरात एक कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. तांत्रिक माहितीच्या आधारे सदर कार छत्रपती संभाजीनगर येथील रियाज इलियास खान याची असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथील आडगाव माहोली येथे छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र रियाज खान पळताना पडून जखमी झाला आणि त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.
या कारवाईत पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली कार आणि आठ हजार रुपयांचे चंदन असा मिळून एकूण तीन लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील चौकशीसाठी आरोपीला नवा मोंढा पोलीस ठाण्याकडे स्वाधीन करण्यात आले. प्रकरणातील इतर आरोपींची माहिती मिळाल्याने त्यांना अटक करण्यासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत. या कारवाईत स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, तसेच सुग्रीव केंद्रे, मधुकर चट्टे, निलेश भुजबळ, पांडुरंग तूपसुंदर, गणेश कौटकर, मुदीराज उत्तम हनवते, जगताप आदींनी सहभाग घेतला.

### पूर्णेतील शिधापत्रिकाधारकांच्या खात्यात थेट रक्कम जमा
### तालुका महसूल प्रशासनाद्वारे माहिती : लाभधारकांना आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थी योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या नावे सातबारा आहे अशा लाभार्थ्यांसाठी महिलांच्या नावे असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम हस्तांतरणद्वारे अन्नधान्यापोटी एकूण ६ हजार ९२७ कार्डधारक व लाभार्थी सदस्यसंख्या २९ हजार ३४३ इतकी असून त्यापैकी ५ हजार ३५० शिधापत्रिकांमधी २३ हजार २५२ लाभार्थ्यांना जुलै ते डिसेंबर - २०२४ या कालावधीतील प्रतिसदस्य १७० रूपये प्रमाणे एकूण २ कोटी ३७ लाख १७ हजार ४० रुपये अनुदानाची रक्कम कार्डधारकांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरित १ हजार ५७७ शेतकरी शिधापत्रिकाधारकांना अद्याप योजनेअंतर्गत लाभ मिळालेला नाही अशा लाभार्थ्यांनी कुटुंबाचे राशन कार्ड, आधार कार्ड, महिला कुटुंब प्रमुखाचे नावे असलेले बैंक पासबुक या कागदपत्रांच्या छायांकित प्रत व मोबाईल क्रमांकासह स्वस्तधान्य दुकानदार, पुरवठा विभाग तहसील कार्यालय येथे जमा करण्याचे आवाहन तहसीलदार माधवराव बोधीकर, नायब तहसीलदार सतीश नाईक, पुरवठा निरीक्षक प्रदीप मोरे यांनी केले आहे.

### झरी जवळील आखाड्यावर सशस्त्र चोरट्यांचा धुमाकूळ : सोन्या-चांदीचे
### दागदागिणे लंपास : मोटारसायकलही पळवली

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील झरी या गावाजवळ अज्ञात चोरट्यांनी शस्त्रास्त्रांचा धाक दाखवून एका आखाड्यावरुन महिलांच्या अंगावरील दागदागिणे लंपास केले. तसेच मोटारसायकलही पळवली.

जिंतूर ते झरी या रस्त्यालगत अनिल वटारे यांचे गट नंबर १०१४ या क्षेत्रातील शेतात आखाडा आहे. गुरुवारी रात्री १२ ते १ वाजेच्या सुमारास तीघा चोरट्यांनी आखाड्यावर येऊन गड्यास मारहाण केली. महिलांना शस्त्रास्त्रांचा धाक दाखवून ४ ग्रॅम सोन्याची पोत,३ ग्रॅम कानातील कुडके, ५ तोळ्याचे पायातील जोडवे तर ५ ग्रॅम कानातील झुंबर हिसकावून घेतले. तर भारत गुहाळे यांच्या गळ्यातील दीड ग्रॅम सोन्याची चैनही लंपास केली. या चोरट्यांनी निघतेवेळी एम.एच. २१ ए.एफ. ४७०२ या क्रमांकाची मोटारसायकलसुध्दा पळवली. चोरट्यांनी निघतेवेळी सर्वांना खोलीत कोंडून बाहेरुन कडी लावली. मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या काही ग्रामस्थांना ही बाब लक्षात आल्यानंतर कडी काढली तेव्हा तो प्रकार उघडकीस आला. दरम्यान, याच आखाड्यावर एक वर्षांपूर्वीच सोयाबीनचे ३८ कट्टे चोरट्यांनी गायब केले होते. दरम्यान, या प्रकाराने ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

### आयुर्वेद कडून रविवारी भंडारीचे व्याख्यान

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील आयुर्वेद व्यासपीठातर्फे श्री धन्वंतरी जयंती समारोहाच्या निमित्ताने येत्या रविवारी (दि.१२) सुप्रसिध्द आयुर्वेदतज्ञ वैद्य विलास भंडारी (पुणे) यांचे व्याख्यान आयोजित केले होते. येथील आयुर्वेद व्यासपीठातर्फे गेल्या २८ वर्षांपासून श्री धन्वंतरी जयंतीच्या निमित्ताने अशा परिपूर्ण व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीही श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी सकाळी ११ वाजता सुप्रसिध्द आयुर्वेदतज्ञ वैद्य भंडारी यांचे 'मणक्याचे विकार : घेऊ आयुर्वेदाचा आधार' या विषयावर व्याख्यान झाले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# जिल्हातील दिव्यांग बाधंवाचे सर्व मागण्या पूर्ण करणार-साकोरे

## दिव्यांग बाधंवान करीता शहरात दिव्यांग भवन उभारणार




**सेलू /प्रतिनिधी-** शहरात आज सकाळी अकरा वाजता श्री साई नाट्य ग्रहात भव्य दिव्यांग मेळावा आणि अभिष्टचितंन सोहळा मा.मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थीतीत सपंन्न . संघर्ष दिव्यांग सघंटना आयोजित दिव्यांगाचे आधार स्तंभ असलेले अशोक काकडे ( मा.जि.बांधकाम सभापती जि.प,) यांच्या वाढ दिवसाचे अवच्चीत साधत अभिष्टचिंतन सोहळा आणि कै.अन्नासाहेब काकडे सेवाभावी संस्था यांच्या कडून दिव्यांग बांधवाना ५०० बँलेकेटचे वाटप या वेळी करण्यात आले. या वेळी बोलतांना मा . मंत्री यांनी आपले सरकार दिव्यांग बाधंवाच्या मागे खंभीर पणे उभे असून दिव्यांग बाधंवाचे सर्वे मागण्या पूर्ण करनार असे जाहीर करताच सर्वे दिव्यांग बाधंवानी टाळ्याच्या गजरात या निर्णयाचे स्वागत करत अशोक काकडे यांचा वाढ दिवसाचा केक कापून त्यांचा हार, शाल, केक खाऊ घालत कार्यक्रम साजरा केला. या वेळी मा.मंत्री मेघना बोर्डीकर, तूकाराम कदम ( मूख्येअधिकारी ) प्रा.डॉ. राजाराम झोडगे, किशोर साळवे पठाण अबरार, शेख अबरार, पप्पू चव्हाण, शेख नासेरभाई, प्रकाश भाले,संदिप फूलारी,दिनकर वाघ, गणेश काटकर,महेशराव खारकर, रामेश्वरजी राठी,अशोच शेलार, दिशागत सर, श्री दौड, मनिष कदम, संतोष कूलकर्णी, प्रसाद खारकर, अशोक उफाडे, यादीची उपस्थीती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूभाष मोहकरे यांनी केले.




## पठाण जावेद खान यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी-** यासेर उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जावेद खान फेरोज खान पठाण यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल यांच्या तर्फे आयोजित राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्याप कशिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. गौरव सेवाभावी संस्था सेलू संचलित यासेर उर्दू प्राथमिक शाळा सेलू येथील मुख्याध्यापक शिक्षक जावेद खान फिरोज खान पठाण यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल तर्फे आदर्श मुख्याध्यापक शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आलेला असून परभणी जिल्ह्यातून त्यांची निवड करण्यात आली आहे दिनांक १२ /११ /२०२५ रोजी मुंबई येथे टिळक भवन महाराष्ट्र काँग्रेस कमिटी सदन येथे पुरस्कार सोहळा संपन्न होणार असून ह्या सोहळ्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब माननीय श्री विजय नामदेवराव वडेट्टीवार साहेब माननीय श्री सत्यजित जी पाटील साहेब (गटनेते विधान परिषद काँग्रेस) व इतर काँग्रेस पक्षाचे आमदार व खासदार यांच्या उपस्थितीत तसेच मा.श्री प्रकाश भाऊ तायडे कार्याध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल माननीय श्री प्रकाश जी सोनवणे प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल ह्या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या रविवारी आयोजित करण्यात आलेला असून राज्यभरातील विविध जिल्ह्यातून ह्या सोहळ्यासाठी शिक्षकांची निवड करण्यात आली आहे परभणी जिल्ह्यातून जावेद खान फेरोज खान पठाण यांची निवड करण्यात आली आहे संस्था अध्यक्ष तथा माजी न.प. सदस्य पठाण रहीम खान खैऊला खान यांनी निवडीमुळे हर्ष व्यक्त केले आहे तसेच निवडीचे विविध शाळेतील मुख्याध्यापक अन्सारी अब्दुल रहीम, श्याम मचाले, संजय भोकरे, रहेमान पठाण, मोहम्मद रईस, मुस्ताक सर, मोरे सर आदींनी अभिनंदन केले आहे.

## हाफिज अली शेर कुरेशी यांची एम.आय.एम मानवत शहर व तालुका संघटन प्रभारीपदी नियुक्ती



**मानवत,/प्रतिनिधी-** ऑल इंडिया मजलिस-ए- इत्तेहादुल मुस्लिमीन () पक्षाच्या मानवत शहर व मानवत तालुक्यातील संघटनात्मक बांधणीसाठी नव्या जबाबदरीची घोषणा करण्यात आली आहे. मोहम्मद गौस (झेन) जिल्हा समन्वयक, एम.आय.एम परभणी यांच्या स्वाक्षरीचे पत्र देण्यात आले या पत्राद्वारे हाफिज अली शेर मेहबुब पाशा कुरेशी यांची ''संघटन प्रभारी मानवत शहर व तालुका'' म्हणून नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीस महाराष्ट्र ए.आय.एम.आय.एम.चे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील तसेच परभणी पर्यवेक्षक हाजी अब्दुल शेख यांनी निवडीस मान्यता दिली आहे.
पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची संघटन शक्ती ग्रामीण तसेच शहरी स्तरावर अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद आहे. या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हाफिज अली शेर कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली संघटन बळकट करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मोहम्मद गौस (झेन) यांनी या वेळी केले.

## सोनपेठ पंचायत समिती सदस्यांचे आरक्षण जाहीर
### उखळी बु. गणातून निवडून येणारी अनुसूचित जाती महिला होणार सभापती

**सोनपेठ /प्रतिनिधी-** तालुक्यातील आगामी काळात होणाऱ्या पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक साठीची आरक्षण सोडत सोमवार दि. १३ ऑक्टोबर सोमवार रोजी तहसील कार्यालय सभागृहात पार पडली.

यावेळी पुढील प्रमाणे आरक्षण सोडत पार पडली. उखळी बु. गन हा (अ. जा. महिला) प्रवर्गासाठी आरक्षित झाला आहे, शिरशी बु गण हा (ना मा प्र) साठी आरक्षित झाला आहे. डिघोळ ई (सर्वसाधारण महिला) साठी आरक्षित आहे. तर उर्वरित नरवाडी, वडगाव व शेळगाव हे तिनही गण (सर्वसाधारण प्रवर्गासाठी) खुले आहेत. सोनपेठ पंचायत समिती सभापती अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्यामुळे एकमेव आरक्षित असलेल्या उखळी बु. पंचायत समिती गणातून निवडून येणारी महिला ही भावी पंचायत समिती सभापती पदी विराजमान असणार आहे. ही आरक्षण सोडत उपजिल्हाधिकारी निवडणूक अरुणा संगेवार यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. यावेळी तहसीलदार सुनील कावरखे, गट विकास अधिकारी मधुकर कदम,नायब तहसीलदार रेड्डी, गोकुळ कोठुळे, अव्वल कारकून दत्ता गिनगिने,देशमुख, तांत्रिक सहाय्यक ज्ञानेश्वर घाडगे,महसूल सहाय्यक हनुमंत फड, पोलिस निरीक्षक अशोक गित्ते,पोउपनिरीक्षक भूषण कांबळे,पो. कॉ वावधाने,पो कॉ श्रीकृष्ण तिडके व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत सोडत पार पडली. आरक्षण सोडत १० वर्षाच्या लहान मुलाच्या हस्ते चिट्ठी उचलून काढण्यात आली.



## चोरवडच्या हिरकणी स्कूल चे तीन विद्यार्थी राहुल, कृष्णा, आनंद बीएएमएससाठी पात्र




**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील नामांकित इंग्रजी शाळा हिरकणी स्कूल चोरवड ता. पालम या शाळेत इयत्ता १ ली ते १० पर्यंत शिक्षण घेतलेले कृष्णा जयवंत कुंडगीर,राहुल अंकुश राठोड,आनंद गजानन हँगरगे, हे विद्यार्थी साठी परीक्षेत उत्तीर्ण झाले असून या यशाबद्दल हिरकणी परिवाराच्या वतीने त्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी हिरकणी चे संस्थापक अशोक लवटे, राजू पाटील,सदानंद दुबेअशोक लवटे,राजू पाटील,सदानंद दुबे, मारुती जोगदंड, धुराजी जाहीर, नितेश तांबे, वर्षा दुबे, यास्मिन तांबोळी, नारायण गांजले,राहुल शिंदे, गौतम कुमार, रामदास कदम,अंजीत कुमार, सोपान काळबांडे, अनिल रायबोले, बाळू फुलारी,वैष्णव लांडगे, श्रवण नायक,बरून नायक,रामदास सोन कांबळे,प्रेमानंद मस्के, अमल सिंह, रणजित शिंह,पल्लवी चामले, शारदा सूर्यवंशी, अर्चना नळगिरे, भाग्यश्री बेंबळगे,ज्योती दहिफळे, स्नेहल लवटे,श्रुष्टि लांडगे, श्रुती किरडे, जनाबाई कदम, रोहिणी ठवरे, युवराज ठवरे,अमोल लवटे,राम कवडे, माऊली लवटे, बंडू देवकते, आकाश शिंदे,अमोल लवटे आदींनी अभिनंदन केले.

### त्या रेल्वेमधून १४ लाखांचे दागिने लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** कोल्हापूर ते नागपूर या रेल्वे प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेऊन एका प्रवाशाची सोन्या-चांदीचे दागदागिणे असणारी बॅग लंपास केली. त्या बॅगेत १४ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल होता. दरम्यान, या प्रकरणात गणेश शांतीलाल राठी या प्रवाशाने पूर्णा लोहमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

राठी दाम्पत्य एक्सप्रेसने प्रवास करीत होते. पूर्णा रेल्वेस्थानकावरुन एक्सप्रेस बाहेर पडल्यानंतर या दाम्पत्यास बॅग चोरीस गेल्याची बाब निदर्शनास आली. ही घटनेची चर्चा रेल्वेत खुप होती.

## मानवत येथे आज दुर्गावहिनीकडून मातृशक्तीचे भव्य संचलन

**मानवत,/प्रतिनिधी- :** विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि दुर्गावाहिनी देवगिरी प्रांत, जिल्हा परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने मानवत शहरात प्रथमच दुर्गा आणि मातृशक्तींचे भव्य संचलन आयोजित करण्यात आले आहे.
''देव, देश आणि धर्म'' या कार्यात नेहमीच अग्रेसर राहिलेल्या मानवत तालुक्यातील या उपक्रमाचा उद्देश हिंदू समाजातील मातृशक्तींचे संघटन व जागृती घडविणे हा आहे. या संचलनाचा भाग म्हणून शहरभर शिस्तबद्ध पथसंचलन काढले जाणार असून, शेकडो दुर्गा आणि महिला स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प.पू. श्री. १००८ स्वामी रसानंदपुरीजी महाराज व ह.भ.प. ओमसतीताई कनोजवार विरसणीकर उपस्थित राहणार आहेत, तर प्रमुख वक्त्या म्हणून साध्वी दुर्गा दीदी बिडकिनकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे आमंत्रक आहेत श्री राजकुमारजी भांबरे (विहिं.ए. जिल्हा मंत्री, परभणी). उत्सवाचा शुभारंभ मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात येईल. संचलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून, मानवत येथून होणार आहे. या उत्सवात सर्वांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व दुर्गावाहिनी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हिंद की चादर'' शाहिद समागम कार्यक्रमाच्या मराठवाडा स्थानीय समितीवर विकास जाधव अंबरवाडीकर यांची निमंत्रित सदस्य म्हणून निवड!

**परभणी,/प्रतिनिधी-** ''हिंद-की-चादर'' शीख समाजाचे धर्मगुरू श्रीगुरु तेग बहादुरसिंग साहिंबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षा निमित्त देशाचे पंतप्रधान माननीय. श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विविध कार्यक्रम पार पडणार असल्याने मराठवाडा क्षेत्रीय आयोजन समिती गठित करण्यात आली.त्या मध्ये निमंत्रित सदस्य म्हणून विकास जाधव अंबरवाडीकर यांची निवड करण्यात आली.

शीख धर्माचे ९ वे गुरू श्री. तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमच्या निमित्ताने चालू वर्षात नांदेड या ठिकाणी पार पडणाऱ्या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी ही समिती कार्यरत असणार आहे. गेल्या अनेक वर्षातील समाज कार्याच्या आधारावर ही निवड महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक विभाग तसेच राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब,परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ.मेघनादीदी बोर्डीकर,मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख.श्री. रामेश्वरजी नाईक यांनी केली असल्याने अंबरवाडीकर यांचे अभिनंदन समाजातून होत आहे.या निवडीबद्दल विकास जाधव यांनी समितीचे जाहीर आभार व्यक्त केले आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्हा परिषदेच्या ५२ गटांची आरक्षण सोडत जाहीर

## दिग्गज राजकारण्यांचे स्वप्न भंगले, कळमनुरी ९ गट आरक्षित



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ आक्टोबर**

मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या हिंगोली जिल्हा परिषदेच्या ५२ गटांची सोमवार दि १३ आक्टोबर रोजी आरक्षण सोडत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. अनेक दिग्गजांचे गट आरक्षित झाल्यामुळे त्यांचे स्वप्न भंगल्याचे दिसत आहे. कळमनुरी तालुक्यात ११ गटांपैकी ९ गट आरक्षित झाले आहेत.

येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात सोमवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, नायब तहसीलदार डी एस जोशी, आनंदकर यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत झाली. यामध्ये लोकसंख्येच्या नुसार गट आरक्षित करण्यात आले आहे. त्यानंतर त्यातून महिला व पुरूष उमेदवारांसाठी सोडत काढण्यात आली. यामध्ये जिल्हा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी जवळा बाजार, उखळी, साखरा, येळेगाव तुकाराम, भानखेडा, फाळेगाव, सिंदगी, खेर्डा, टेंभूर्णी, गिरगाव, हट्टा, पुरजळ, कुरूंदा तर अनुसूचीत जातीसाठी बाभूळगाव, आडगाव, गोरेगाव, आजेगाव, शेवाळा, आखाडा बाळापूर, हयात नगर, हत्ता यांचा समावेश आहे. अनुसूचीत जमाती साठी पोत्रा, पिंपळदरी, खरवड, वाकोडी, सिध्देश्वर, जलालदाबा यांचा समावेश आहे.

यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अनिल पतंगे यांचा बाभूळगाव गट, सभापती संजय देशमुख, अंकुश आहेर, संजय दराडे, बाळासाहेब मगर, माजी सभापती संजय बोंढारे, शामराव जगताप यांचे गट आरक्षित झाले आहेत. तर ठाकरे गटाचे गोपू पाटील, शेवाळा येथील अभय सावंत यांचा शेवाळा गट आरक्षित झाला आहे. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनीष आखरे, आंबादास भोसले, माजी जि प सदस्या मालती कोरडे, यशोदा दराडे यांना मात्र यावेळी पुन्हा एकदा निवडणुक लढविण्याची संधी मिळणार आहे. आजच्या आरक्षण सोडतीमध्ये इच्छुक उमेदवारांमध्ये कही खुशी कही गम पहावयास मिळाले. आता इच्छुकांनी सुरक्षित गटाचा शोध सुरू केला आहे.

# औंढा नागनाथ पंचायत समिती गणनिहाय आरक्षण सोडत

## उपजिल्हाधिकारी मंजूषा मुथा यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ आक्टोबर**

पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक गणनिहाय आरक्षण सोडत कार्यक्रम सोमवारी( ता.१३) रोजी सकाळी ११ वाजता औंढा नागनाथ पंचायत समिती सदस्यपदाच्या आरक्षणाची सोडत मा.नियंत्रण अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलमधील सभागृहामध्ये करण्यात आली.

आरक्षण सोडती प्रसंगी प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार हरीश गाडे, निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, महसूल नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, नायब तहसीलदार अनिता कोलगणे हे होते. आरक्षण सोडत कार्यक्रम प्रसंगी मल्हारी शिरसागर, श्रीकृष्ण दराडे, इम्रान पठाण, उमाकांत मुळे, नितीश कुलकर्णी, विनोद घोडके,शेख सलीम, विनोद साळवे, कैलास जाधव, नामदेव घोणे यांनी परिश्रम घेतले. औंढा पंचायत समिती गणनिहाय आरक्षण सोडत कार्यक्रम प्रसंगी तहसील सभागृहामध्ये लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते. गणनिहाय आरक्षण सोडत चिठ्ठीद्वारे काढण्यात आले. यावेळी आरक्षण चिठ्ठ्या ह्या आदिती रमेश फोपसे या मुलीच्या असते काढण्यात आल्या.

औंढा नागनाथ तालुका पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय आरक्षण लाख, जलालदाभा, भोसी, दौडगाव (सर्वसाधारण महिला), असोला तर्फे औंढा (अनुसूचित जाती महिला), पिंपळदरी तर्फे नांदापूर, असोला तर्फे लाख (अनुसूचित जमाती महिला), सेंदुरसना, जवळा बाजार (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), येहळेगाव सोळंके, माथा, आजरसोंडा, पुरजळ, शिरडशहापूर(सर्वसाधारण), रुपुर (अनुसूचित जाती), सिद्धेश्वर (अनुसूचित जमाती), येडूद, उखळी (नागरिकांचा मागास प्रवर्ग)असे गणनिहाय हे आरक्षण आहेत.

# कळमनुरी पंचायत समिती गणनिहाय आरक्षण सोडत जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, १३ आक्टोबर**



पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक गणनिहाय आरक्षण सोडत कार्यक्रम सोमवारी( ता.१३) रोजी सकाळी ११ वाजता कळमनुरी पंचायत समिती सदस्यपदाच्या आरक्षणाची सोडत नियंत्रण अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलमधील सभागृहामध्ये करण्यात आली.


आरक्षण सोडती प्रसंगी प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार जीवककुमार कांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी लहान मुलाच्या हाताने पंचायत समिती गणनिहाय आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या काढण्यात आल्या. त्यामध्ये अनुसूचीत जाती ४, अनुसूचीत जमाती ५, नागरिकांचा मागास प्रवर्ग ५, सर्वसाधारण ८ एकूण २२ गणाचे आरक्षण सोडत काढण्यात आले. मसोड सर्वसाधारण, खरवड अनूसूचीत जमाती, वाकोडी अनुसूचीत जमाती महिला, बाभळी सर्वसाधारण महिला, येहळेगाव तुकाराम सर्वसाधारण, येलकी सर्वसाधारण महिला, सालेगाव अनुसूचीत जाती महिला, नांदापूर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सिंदगी सर्वसाधारण, कोंढूर सर्वसाधारण, पोत्रा अनुसूचीत जमाती, बोथी अनुसूचीत जमाती महिला, कांडली अनुसूचीत जाती, आखाडा बाळापूर नागरिकांचा मागास प्रवर्ग, शेवाळा नागरिकांचा मागास प्रवर्ग, दाती अनुसूचीत जाती, वारंगा फाटा सर्वसाधारण महिला, तोंडापूर अनुसूचीत जाती महिला, दांडेगाव अनुसूचीत जमाती महिला, जवळा पांचाळ सर्वसाधारण, डोंगरकडा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, वरूड नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला याप्रमाणे आरक्षण सोडत जाहीर झाले आहे.



**हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समितीच्या सभागृहात आज जिल्हा परिषदेच्या गटांचे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षाचे इच्छुक दिग्गज उमेदवार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### तीन दिवस पाणीपूरवठा बंद राहणार



हिंगोली– शहरातील सर्व नागरिकांना सुचीत करण्यात येते की, हिंगोली शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत सिध्देश्वर धरण येथुन पाणीपुरवठा करणा–या मुख्य जलवाहिनीवरील नॉन रिर्टन वॉल नादुरूस्त झाल्यामुळे पाण्याची गळतीमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सदरील वॉलची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हिंगोली शहर पाणीपुरवठा योजनेचे सिध्देश्वर येथीलवॉलचे दुरुस्तीचे कामे दिनांक १३/१०/२०२५ रोजी पासुन सुरुवात करण्यात आलेले आहे. परंतु सदरील वॉलची दुरुस्तीचे कामे पुर्ण होई पर्यत दिनांक १३/१०/२०२५ ते १५/१०/२०२५ पर्यत हिंगोली शहराचा पाणी पुरवठा बंद राहिल व दुरुस्ती काम पुर्ण होताच तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल याची नोंद घेवुन नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा जपुन वापर करावा व नगरपरिषदेस सहकार्य करावे असे आवाहन नगर पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

### पोलिस दलाकडून सायबर सेल सुरक्षा कार्यक्रम



हिंगोली– जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यांतर्गत विविध शाळा, महाविद्यालयात पोलिस दलाच्यावतीने मी दक्ष सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या सूननेनुसार जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयात १३ पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत हे अभियान सुरू असून या अभियानांतर्गत सायबर गुन्ह्यांपासून सावधान राहण्यासाठी मुलामुलींनी घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. यामध्ये अेपीके च्या फसव्या लिंक, लोण अॅप, केबीसी ऑनलाईन लॉटरी, डीजीटल अरेस्ट, ऑनलाईन इन्वेस्टमेंट, सोशल मिडीयातून होणारी फसवूणक, ऑनलाईन मॅट्रीमोनीअल साईटवरून होणारी फसवणूक आदीबाबत माहीती देण्यात येत आहे. तसेच विद्यार्थी–विद्यार्थ्यांना तत्काळ मदतीसाठी ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आणि सायबर फसवणूक झाल्यास १९४५, १९३० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# मुदत संपूनही झोका, पाळणे न काढणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ आक्टोबर**



येथील दसरा महोत्सवानिमित्तप्रदर्शनीत समितीच्यावतीने २ आक्टोबरपर्यंत करारनाम्यानुसार झोका, पाळणे आदी मनोरंजनाच्या साधनांना परवानगी दिली होती परंतु दि १२ आक्टोबरपर्यंत संबंधिताने रामलीला मैदानावर अवैधपणे कब्जा करून ही साधने ठेवल्यामुळे मंडळ अधिकारी सय्यद अयुब यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष म्हणजे एका राजकीय पक्षाकडून दि १२ आक्टोबर रोजी रविवारी या प्रदर्शनीत सर्व साधने फ्री असणार असल्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे दसरा महोत्सव समितीच्या कार्यपध्दतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

येथील दसरा महोत्सव समितीच्यावतीने पाळणा, झोका तसेच इतर साधनांसाठी निविदेप्रमाणे दि २२ आक्टो ते २ आक्टोबर पर्यंत करार नाम्यानुसार रामलीला मैदानावर साधने ठेवण्याची परवानगी दिली होती परंतु संबंधीत शेख आजम शेख मुनाफ यांनी अटी व शर्थींचे उल्लंघन करीत दि १२ आक्टोबरपर्यंत साधने चालूच ठेवली. त्यामुळे दुपारी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी सय्यद अयूब यांनी सील ठोकले तसेच महावितरणची वीजजोडणीही तोडली परंतु त्यानंतरही झोका, पाळणे व इतर मनोरंजनाचे साधने सुरूच ठेवल्यामुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होऊनही दि १२ आक्टोबर रोजी रात्री उशिरापर्यंत संबंधिताने ही साधने चालूच ठेवली. एका राजकीय पक्षाने यादिवशी प्रदर्शनीत येणाऱ्यांसाठी सर्व साधने फ्रि असे बॅनर शहरात आणि सोशल मिडीयावर टाकल्याने मोठ्या संख्येने गर्दी झाली होती. दसरा महोत्सव समिती आता काय कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वसमत म्हातारगाव येथे आ. नवघरे यांचेहस्ते विविध कामांचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ आक्टोबर**



विकास हीच खरी ओळख या ब्रीदवाक्याला साजेसं काम करत आमदार राजू नवघरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासन दरबारी मंजूर झालेल्या म्हातारगाव येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन सोमवारी उत्साहात आणि जल्लोषात पार पडले.

गावाच्या सर्वांगीण प्रगतीचा नवा अध्याय सुरू करत पुढील महत्वाची कामे आज भूमिपूजनाच्या टप्प्यात दाखल झाली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत म्हातारगाव ते धामणगाव रस्ता भूमिपूजन या रस्त्याच्या बांधकामामुळे दोन गावांतील संपर्क सुधारेल, वाहतुकीला वेग येईल आणि शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीस मोठा फायदा होणार आहे. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी हे सभागृह एक उत्तम व्यासपीठ ठरणार असून गावातील सर्वच घटकांना याचा थेट लाभ मिळणार आहे. गावातील अंतर्गत रस्ते मजबूत झाल्याने नागरिकांना सोयीस्कर व सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असून गावाच्या सौंदर्यातही भर पडणार आहे.या सर्व विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी आमदार राजू भैया नवघरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत सांगितले की विकासाची गाडी कोणत्याही राजकीय सीमांमध्ये अडकणार नाही. जनतेच्या विश्वासाला उतराई होणे, हेच आमचे ध्येय आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक शिवारात विकास पोहोचवण्यासाठी आमची वचनबद्धता कायम राहील. कार्यक्रमास गावातील सर्व मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य, महिला, युवक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरणात उत्साह आणि अभिमान यांचे सुंदर मिश्रण पाहायला मिळाले. म्हातारगावातील जनतेने या विकास उपक्रमांना मोठा प्रतिसाद देत आमदार नवघरे यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

# परशुराम उद्यानासाठी एक कोटी निधीच्या कामाचे भूमीपूजन– आ. मुटकुळे

## कन्यका परमेश्वरी उद्यान व सभामंडपाचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ आक्टोबर**





शहरातील एनटीसी भागातील नियोजित वासवी माता कन्यका परमेश्वरी उद्यानाचे तसेच भगवान परशुराम उद्यानाचे सोमवार दि १३ आक्टोबर रोजी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी भगवान परशुराम उद्यान विकासासाठी एक कोटीचा निधी देणार असल्याचे आश्वासन आ. मुटकुळे यांनी दिले.

येथील एनटीसी भागात सोमवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते भगवान परशुराम उद्यानात विविध विकास कामांचे भूमीपूजन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, पवन उपाध्ये, श्री वर्मा, डॉ माहुरकर, प्रा सुरेश विडोळकर, रजनी पाटील, प्रा दुर्गादास साकळे, प्रद्युम्न गिरीकर, शैलेश नांदेडकर, रजनीश पुरोहीत, डॉ संजय नाकाडे, मनोज शर्मा, आशिष शर्मा, अशोक शर्मा आदींची उपस्थिती होती.

सोमवारी सकाळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या विकास निधी अंतर्गत वासवी कन्याका परमेश्वरी उद्यान व सभामंडप करिता निधी प्राप्त होताच तातडीने भुमीपूजन सोहळा मान्यवरांच्या व सर्व समाज बांधवाच्या समक्ष संपन्न झाला. यावेळी शहराचे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जेष्ठ पदाधिकारी के. के. शिंदे, विरकुंवर अण्णा, प्रशांत सोनी, श्यामभाऊ खंडेलवाल, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कैलास शहाणे, मनोज शर्मा, श्री ठाकूर, रजनीताई पाटिल नगर परिषदेचे इंजिनीअर प्रतीक नाईक, गुत्तेदार मयुर कयाल हे यावेळी उपस्थित होते. सर्वप्रथम आमदार मुटकुळे सह आर्य वैश्य समाजाचे प्रतिनिधी जेष्ठ नगईक कांता गुंडेवार, अशोक बासटवार, शेखर बासटवार, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष काळात झालेले विकास कामांची माहिती बाबाराव यांनी सांगितली. मागील १० वर्षात आ मुटकुळे यांच्या मार्गदर्शनात शहराचा विकास झाला असही ते म्हणाले. आमदार मुटकुळे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेली शहरासाठीची सर्व कामे व पुढील काळातील शहरासाठीचा त्यांचा विकास आराखडा सांगितला. आर्य वैश्य समाजातील जेष्ठ व तरुण समाज बांधव यांची यावेळी उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




बीड जिल्हा बांधकाम संघटना (लाल बावटाचे) आज सरकारी कामगार अधिकारी कार्यालयावर बीड येथे धडक मोर्चा काढण्यात आला. बांधकाम कामगारांना दिवाळी बोनस १५ हजार रूपये भत्ता द्या, सहा महिन्यापासून प्रलंबित नोंदणी नुतनीकरणाचे अर्ज तातडीने निकाली काढा आदि मागण्यांसाठी कॉ.ओम पुरी, कॉ.पप्पू आजबे यांच्या नेतृत्वाखाली कामगार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. (छाया-कृष्णा शिंदे)





# बांधकाम कामगारांना दिवाळी बोनस द्या; कामगार कार्यालयावर कामगारांचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

बांधकाम कामगारांना १५ हजार रूपये दिवाळी बोनस देण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी आज सोमवारी बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेच्यावतीने कामगार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

जिल्ह्यात नवीन भांडेसेट देण्याची कारवाई तात्काळ करण्यात यावी, कामगारांना १५ हजार दिवाळी बोनस देण्यात यावे, सहा महिन्यापासून प्रलंबित नोंदणी व नुतनीकरणाचे अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे, अटल घरकुल बांधकाम कामगारांचे अर्ज मंजूर करावे, चुकीच्या त्रुटी नोंदणी व नुतनीकरण व लाभार्थ्याच्या अर्जात काढणार्या नोंदणी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी आज बांधकाम कामगार संघटनेच्यावतीने कामगार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

# बीड जिल्हा परिषदेचे संपूर्ण आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

जिल्हा परिषद गट
१) रेवकी:सर्वसाधारण महिला
२) तलवाडा : सर्वसाधारण
३) जातेगाव :सर्वसाधारण
४) गढी :सर्वसाधारण
५) धोंडराई :सर्वसाधारण महिला
६) उमापूर : ओबीसी(महिला)
७) चकलांबा:ओबीसी
८) मादळमोही :सर्वसाधारण महिला
९) पाडळसिंगी:सर्वसाधारण
१०) केसापुरी : अनुसूचित जाती
११) गंगामसला :ओबीसी
१२) टाकरवण :सर्वसाधारण महिला
१३) तालखेड :अनुसूचित जाती
१४) पात्रुड :सर्वसाधारण महिला
१५) दिंद्रुड :सर्वसाधारण महिला
१६) उपळी: ओबीसी (महिला)
१७) चिखलबीड :सर्वसाधारण
१८) राजुरी:सर्वसाधारण महिला



१९) बहिरवाडी:सर्वसाधारण महिला
२०) पिंपळनेर:सर्वसाधारण
२१) नाळवंडी :सर्वसाधारण महिला
२२) पाली :सर्वसाधारण महिला
२३) नेकनूर: ओबीसी
२४) लिंबागणेश :सर्वसाधारण
२५) चौसाळा:सर्वसाधारण
२६) घाटशिळ पारगाव :सर्वसाधारण महिला
२७) रायमोहा :सर्वसाधारण
२८) पाडळी: ओबीसी(महिला)
२९) पिंपळनेर :सर्वसाधारण
३०) डोंगरकिन्ही: ओबीसी
३१) अंमळनेर :ओबीसी
३२) पारगाव घुमरा:सर्वसाधारण
३३) दौलावडगाव :सर्वसाधारण महिला
३४) धामणगाव:सर्वसाधारण
३५) धानोरा :सर्वसाधारण महिला
३६) लोणी (स) :सर्वसाधारण महिला
३७) कडा :सर्वसाधारण महिला
३८) मुर्शदपुर:सर्वसाधारण
३९) आष्टा ह ना. : सर्वसाधारण महिला
४०) विडा:सर्वसाधारण महिला



४१) येवता :ओबीसी( महिला)
४२) आडस : ओबीसी
४३) होळ :अनुसूचित जाती (महिला)
४४) चिंचोलीमाळी :ओबीसी(महिला)
४५) नांदुरघाट :ओबीसी(महिला)
४६) युसूफवडगाव :सर्वसाधारण
४७) तेलगाव :अनुसूचित जाती (महिला)
४८) भोगलवाडी : अनुसूचित जमाती
४९) आसरडोह :ओबीसी
५०) सिरसाळा :सर्वसाधारण
५१) पिंप्री :अनुसूचित जाती
५२) माड़वा (परळी) :सर्वसाधारण महिला
५३) मोहा :अनुसूचित जाती
५४) जिरेवाडी :अनुसूचित जाती (महिला)
५५) धर्मापुरी : ओबीसी
५६)जोगाईवाडी :सर्वसाधारण
५७) घाटनांदूर :सर्वसाधारण महिला
५८) पट्टीवडगाव :सर्वसाधारण
५९) बर्दापुर :ओबीसी(महिला)
६०) चनई : ओबीसी(महिला)
६१) पाटोदा म. :अनुसूचित जाती (महिला)

# नगरपालिका निवडणुकी च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची अंबाजोगाई, परळीत उद्या महत्त्वपूर्ण रणनीती बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब खासदार श्रीकांत शिंदे साहेब सचिव संजय मोरे साहेब यांच्या आदेशाने तसेच मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिकेत भगवा फडकवण्याच्या ध्यासाने शिवसेनेने महत्त्वपूर्ण बैठक उद्या, १४ नोव्हेंबररोजी अंबाजोगाई आणि परळी येथे आयोजित केली आहे.

बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रभाग निहाय उमेदवार , प्रचार योजना, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक स्तरावरील रणनीतीवर सखोल चर्चा होईल. शिवसेना कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिकेत भगवा फडकवण्याची तयारी पूर्ण ठेवावी, अशी मार्गदर्शक सूचना देखील या बैठकीत देण्यात येणार आहे. उद्या १४ ऑक्टोबर रोजी दुपारी २:०० वाजता परळी येथील येथील शासकीय विश्रामगृह येथे तर दुपारी ४:०० वाजता सावता माळी चौक ज्योती नगर आंबेजोगाई येथे बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक आगामी नगरपालिका निवडणुकीत यश मिळवण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. पक्षाची रणनीती ठरविण्यासोबतच कार्यकर्त्यांना संघटित करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे. बैठकीस शहरातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी अंगीकृत संघटना आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

# संतांच्या वैचारिक चळवळीमुळे महाराष्ट्र परकीय दास्यातून उभा राहिला-ह.भ.प. डॉ. भावार्थ देखणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

महाराष्ट्रातील अठरा पगड जातीतल्या संतांनी जी वैचारिक चळवळ महाराष्ट्राला दिली, त्यामुळे यावनी आणि परकीय अत्याचारातून महाराष्ट्र उभा राहू शकला असे गौरवोद्गार वारी सोहळा प्रमुख आणि माऊली ज्ञानेश्वर आळंदी संस्थान चे विश्वस्त ह.भ.प. डॉ. भावार्थ देखणे यांनी काढले. ज्येष्ठ समर्थ भक्त आणि श्री सुंदर मठ सेवा समितीचे विश्वस्त तसेच दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन चे संचालक डॉ. विजय लाड यांच्या सोलिव सुख या ग्रंथाचे प्रकाशन करताना दासबोध ग्रंथाचे जन्मस्थळ असलेल्या शिवथरघळीत डॉ. देखणे बोलत होते.

संत ज्ञानेश्वर ज्ञानाचे, जगद्गुरु तुकाराम महाराज भक्तीचे, संत नामदेव प्रीतीचे तर समर्थ रामदास हे शक्तीचे प्रतीक आहेत. संतांनी जागवलेल्या वैचारिक चळवळीत भक्ती सोबत सामाजिक अनुसंधान तेवढेच महत्त्वाचे होते. समर्थ रामदास स्वामींचे पट्टशिष्य श्री कल्याण स्वामी यांनी केवळ पन्नास ओव्यांचे योग मार्गावरील आलेल्या अनुभवाचे विवेचन केले, ते म्हणजे सोलिव सुख.

चाळीस वर्षांपूर्वी पू. अक्का वेलणकर यांनी बीजारोपण केलेला दासबोध सखोल अभ्यास हा उपक्रम समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान देशातच नव्हे तर जगात पोचवण्याचे मोठे कार्य करीत असल्याबद्दल डॉ. देखणे यांनी समाधान व्यक्त केले. श्री कल्याण स्वामी कृत सोलिव सुख या काव्यावरच्या विवेचनाचे प्रकाशन ह. भ.प. डॉ. भावार्थ देखणे आणि ज्येष्ठ समीक्षक माधुरीताई गाडगीळ यांच्या हस्ते शिवथरघळीत करण्यात आले. महाराष्ट्रासह चार राज्यातील समर्थ भक्त या साधना सप्ताहासाठी श्रीक्षेत्र शिवथरघळ येथे उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. शुभदा थिटे, सौ. अपर्णा वांगीकर, सौ. रंजना पाटील, विनायक विद्वांस, बाळासाहेब पाटील, संतोष सप्रे यांनी परिश्रम घेतले. सोहळ्याचे संचलन सौ. मेधा कुलकर्णी यांनी केले.

# बीड पं.स.मध्ये गणात १० गण सर्वसाधारणसाठी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

बीड पंचायत समिती गणाचे आज दुपारी तहसील कार्यालयामध्ये आरक्षण जाहीर झाले. यामध्ये दोन गण अनुसूचीत जातीसाठी, ४ गण ओबीसींसाठी तर १० गण सर्वसाधारणसाठी सुटले आहेत.

बहीरवाडी - महिला अनुसुचीत जाती, नाळवंडी - पुरुष अनुसुचीत जाती, येळंबघाट - ओबीसी, बोरखेड -ओबीसी महिला, चर्हाटा - ओबीसी महिला, ताडसोन्ना - ओबीसी, पिंपळनेर - सर्वसाधारण महिला, नवगण राजुरी -सर्वसाधारण पुरुष, नेकनूर -सर्वसाधारण महिला, पाली - सर्वसादारण महिला, घोडका राजुरी -सर्वसाधारण, लिंबागणेश -सर्वसाधारण महिला, चौसाळा - सर्वसाधारण, ढेकणमोहा - सर्वसाधारण, मांजरसुंबा - सर्वसाधारण, कामकेडा - सर्वसाधारण महिला

# अंबाजोगाई शहरातील चुकीच्या पद्धतीने केलेली प्रभाग फेररचना व मतदार याद्यामधील नावांची अनाधिकृतपणे केलेली अदलाबदल तात्काळ दुरूस्त करावी- राजकिशोर मोदी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ ऑक्टोबर**

नुकतीच अंबाजोगाई शहरातील प्रभागाची फेररचना नगर परिषद प्रशासनाच्या वतीने जाहिर करण्यात आली आहे. या प्रभागाच्या फेररचनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये मतदाराच्या नावांची बहुतांश ठिकाणी आदलाबदल करण्यात आली आहे. प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली मतदारांची आदलाबदल ही त्या त्या मतदारांना सुद्धा अमान्य असल्याची तक्रार मतदार करत आहेत. त्यामुळे जाहीर करण्यात आलेली प्रभागरचना व प्रारूप मतदार याद्या या तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री , मुख्य निवडणूक आयुक्त, जिल्हाधिकारी बीड, पालकमंत्री बीड, तहसीलदार अंबाजोगाई तसेच मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन सादर करताना यावेळी राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, मनोज लखेरा, महादेव आदमाने, धम्मा सरवदे, हाजी महमूद ,सुनील वाघाळकर , कचरू सारडा, मोईन शेख, अकबर पठाण यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्या वतीने तहसीलदार विलास तरंगे तसेच मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांनी निवेदन स्वीकारले.



उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात अंबाजोगाई नगर परिषद प्रशासनाने राजकीय दबावापोटी व त्यांच्या सोयीनुसार प्रभाग रचना व मतदार याद्या तयार केलेल्या दिसून येत आहेत. प्रत्येक यादीमध्ये किमान २०० ते ५०० नावांची अफरातफर किंवा आदलाबदल केली आहे. शहरातील सर्वात मोठा गणल्या जाणारा प्रभाग क्रमांक १५ यामध्ये ४८०० मतदार दाखवले आहेत. तर दोन सदस्य असलेल्या प्रभागात ५८०० पेक्षा जास्त मतदार सामील केले आहेत. याबाबत मतदारांत संभ्रम निर्माण होत आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली येऊन काम करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांतुन केल्या जात आहे. त्याचबरोबर काही प्रभागात ग्रामीण भागातील तथा शहराबाहेरील जसे की जोगाई वाडी व अन्य ठिकाणची ३००० ते ४००० नावे समाविष्ट केल्याचे आढळुन येत आहे. ती नावे वगळण्यात यावीत अशी मागणी देखील राजकिशोर मोदी यांनी आपल्या निवेदनातून केली आहे.

दोन सदस्य असलेल्या प्रभागात (प्रभाग क्र. १२) ५८४९, (प्रभाग क्र. १०) ५५३०, (प्रभाग क्र. ४) ५४१२, (प्रभाग क्र. १)५३०३ असे मतदार दर्शविले आहेत. तर तीन सदस्य असणाऱ्या प्रभागात केवळ (प्रभाग क्र. १५) ४८७६ मतदार दर्शविले आहेत. त्यावरून असे निर्देशित होते की, हेतूपुरस्कर रित्या ज्या प्रभागात सत्ताधाऱ्यांना विरोध होणार आहे अशा प्रभागात कमी मतदार दर्शविले आहेत. तर विरोधकांच्या प्रभागात जास्तीत- जास्त मतदार नोंदविण्याचा प्रकार घडविण्यात आलेला असल्याचे दिलेल्या निवेदनात राजकिशोर मोदी यांनी नमूद केले आहे. तेंव्हा मतदार संख्येत केलेली ही असमानता आश्चर्य जनक असून, त्यावर मा. निवडणुक निर्णय अधिकारी साहेबांनी गांभीर्याने विचार करावा. असे न झाल्यास पुढील ८ दिवसात अमरण उपोषण किंवा अन्य कायदेशीर मार्गाचा पर्याय निवडावा लागेल असा इशारा मोदी यांनी निवेदना द्वारे दिला आहे.

अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन तथा निवडणूक प्रशासनाने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेमध्ये तसेच मतदार याद्यामध्ये केलेली असमानता तात्काळ दुरूस्त करण्यासाठी संबंधितास आदेशीत करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करताना प्रा शैलेश जाधव, जावेद गवळी, ॲड दयानंद लोंढाळ, अनिल पसारकर, बबन पाणकोळी, अशोक देवकर, काझी खयामोद्दिन , गोविंद पोतंगले, रशीद भाई,सय्यद ताहेर, सचिन जाधव, दत्ता सरवदे, महेश कदम, शाकेर काझी, अकबर पठाण, भीमसेन लोमटे, मतीनं जरगर, राम घोडके, मुन्ना पठाण, सुदाम देवकर, सुशील वाघमारे, महेबूब गवळी, दत्ता हिरवे, रफिक गवळी, जमदार पठाण, आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, अक्षय परदेशी, शरद काळे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

निवेदन स्वीकारताना मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी जाहीर करण्यात आलेल्या मतदार यादीत अप्रत्यक्षपणे चुका झाल्याचे मान्य करत नजरचुकीने झालेल्या चुका या दुरुस्त करण्यात येतील व मतदारांमध्ये झालेला संभ्रम दूर करण्यात येईल असे राजकिशोर मोदी यांना सांगितले.

# चि.वरद लांडगेची चमकदार कामगिरी; पहिल्याच प्रयत्नात विभागीय जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत धडक

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ ऑक्टोबर**

परळी येथील न्यू हायस्कूल शाळेचा विद्यार्थी चिरंजीव वरद श्रीराम लांडगे (इयत्ता आठवी) याने विभागीय जलतरण स्पर्धेत आपली चमकदार कामगिरी नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. फक्त पहिल्याच प्रयत्नात विभागीय विजेतेपद मिळवून वरदने राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी पात्रता मिळवली असून हा परळी तालुका व न्यू हायस्कूल शाळेसाठी अभिमानाचा क्षण ठरला असून आगामी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये तो आता बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

याबाबतीत अधिक माहिती अशी की, इयत्ता आठवीत शिकणारा वरद श्रीराम लांडगे या न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्याने पहिल्याच प्रयत्नात विभागीय जलतरण स्पर्धा जिंकली आणि तो आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. पहिल्याच प्रयत्नात राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेपर्यंत मजल मारणारा वरद हा न्यू हायस्कूल शाळेचा पहिलाच विद्यार्थी आहे. त्याने ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात उत्कृष्ट जलतरण कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. त्याच्या अथक मेहनतीचे आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे हे यश मानले जात आहे या यशासाठी त्याला स्विमिंग कोच संजय भगत सर आणि शालेय क्रीडा शिक्षक नारायण वानखेडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

वरदच्या या उल्लेखनीय यशाने शाळेची परळीची तथा बीड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली असून या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव आमदार सतीशभाऊ चव्हाण तसेच शालेय समिती परळी वैजनाथचे अध्यक्ष नानासाहेब (काका) सोळंके यांनी वरदच्या यशाची प्रशंसा करत अभिनंदन करून त्याला आगामी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शाळेचे मुख्याध्यापक श्री. मोरे, के. व्ही. पर्यवेक्षिका सौ. छाया देशमुख, क्रीडा शिक्षक श्री. नारायण वानखेडे, श्री. अमर देशमुख तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वरदचा सत्कार करत पालक आणि विद्यार्थी वर्गाचे अभिनंदन केले.



वरदच्या विजयामुळे शाळा, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असून राज्यस्तरीय स्पर्धेतही त्याच्या यशस्वीतेसाठी सर्वांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. वरदच्या यशाने परळीतील क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेत तो नक्कीच यश संपादन करेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# नांदेड जिल्हा परिषद सदस्यांचे आरक्षण निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १३ ऑक्टोबर-**

नांदेड जिल्हा परिषद सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज सोमवार १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडला. याबाबतची माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.



जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२५ अन्वये आरक्षण कार्यक्रम दिल्याप्रमाणे नांदेड जिल्हा परिषदेच्या एकूण ६५ निवडणूक विभागाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज पार पडला. त्यानुसार निवडणूक विभागास आरक्षण निश्चीत करण्यात आले आहे.

माहूर तालुक्यात १-वाई बा.- सर्वसाधारण, वानोळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

किनवट तालुक्यात सारखणी- अनुसूचित जमाती, मांडवी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), गोकुंदा- सर्वसाधारण, बोधडी बु.- अनुसूचित जमाती (स्त्रीआ.), जलधारा- अनुसूचित जमाती, इस्लालपूर- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर).

हिमायतनगर तालुक्यात सरसम (बु)- अनुसूचित जमाती (स्त्रीर), पोटा बु.- सर्वसाधारण (स्त्री्).

हदगाव तालुक्यात निवघा (बा)- अनुसूचित जाती (स्त्रीर), रूई धा.- सर्वसाधारण (स्त्रीत),मनाठा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर), पळसा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, आष्टीा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, तामसा- अनुसूचित जमाती.

अर्धापूर तालुक्यात लहान- सर्वसाधारण, मालेगाव- सर्वसाधारण (स्त्री्), येळेगाव- सर्वसाधारण (स्त्री्).

नांदेड तालुक्यात वाजेगाव- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर), वाडी बु.- सर्वसाधारण, लिंबगाव- अनुसूचित जाती, धनेगाव- सर्वसाधारण (स्त्री्), बळीरामपूर- अनुसूचित जाती.

मुदखेड तालुक्यात बारड- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, मुगट- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

भोकर तालुक्यात पाळज- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, भोसी- अनुसूचित जमाती (स्त्री्), पिंपळढव- सर्वसाधारण.

उमरी तालुक्यात गोरठा- सर्वसाधारण (स्त्रीत), तळेगांव- अनुसूचित जाती.

धर्माबाद तालुक्यात करखेली- सर्वसाधारण, येताळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

बिलोली तालुक्यात आरळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सगरोळी- सर्वसाधारण (स्त्री्), लोहगांव- सर्वसाधारण, अटकळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री).

नायगांव (खै.) तालुक्यात बरबडा- सर्वसाधारण (स्त्री्), कुंटूर- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर). मांजरम- अनुसूचित जाती (स्त्रीर), नरसी- अनुसूचित जाती (स्त्रीत).

लोहा तालुक्यात सोनखेड- सर्वसाधारण, वडेपूरी- सर्वसाधारण (स्त्रीत), उमरा- सर्वसाधारण, सावरगांव न.- सर्वसाधारण, कलंबर बु.- सर्वसाधारण (स्त्रीर), माळाकोळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर).

कंधार तालुक्यात शिराढोण- सर्वसाधारण, कौठा- अनुसूचित जाती (स्त्री्), बहाद्दरपुरा- सर्वसाधारण (स्त्रीर), फुलवळ- सर्वसाधारण (स्त्रीत), पेठवडज- सर्वसाधारण, कुरूळा- सर्वसाधारण.

मुखेड तालुक्यात जांब बु.- अनुसूचित जाती, चांडोळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर), एकलारा- सर्वसाधारण, येवती- अनुसूचित जाती, सावरगाव पि.- अनुसूचित जाती (स्त्रीत), बा-हाळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्रीर), मुक्रामाबाद- सर्वसाधारण (स्त्री्).

देगलूर तालुक्यात खानापूर- अनुसूचित जाती (स्त्री्), शहापूर- अनुसूचित जाती, करडखेड- अनुसूचित जाती (स्त्री्), मरखेल- सर्वसाधारण (स्त्रीा), हाणेगाव- सर्वसाधारण.

# दर्गा व लेणी रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडे-झूडपे तोडा!

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. १३ ऑक्टोबर-**

माहूर शहरातील वार्ड क्र.०१ कपिलनगर मधील पांडवलेणी व बाबा सोनापीर दर्गाह रोड परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा बाजूकडील भागात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या झाडाझुडपांत दबा धरून लपून बसलेल्या हिंस्र प्राण्याकडून नागरिकांवर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने,ही झाडेझुडपे तोडून परीसर स्वच्छ करण्याची मागणी युवासेना शहर प्रमुख (एशिं) राणा ऊर्फ विजयसिंह हजारी यांचेसह वार्डातील अनेक नागरिकांनी नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांना आज सोमवार दि.१३ ऑक्टोबर रोजी दिलेल्या लेखी निवेदनातून केली आहे.



शहरातील कपीलनगर मध्ये प्रसिद्ध कपिलेश्वर महादेव मंदिर हे सतत भाविकांच्या वर्दळीने गजबजलेले धार्मिक स्थळ असून ,याजवळूनच बाबा सोनापीर दर्गाह व पांडवलेणी या धार्मिक व पौराणिक स्थळासह विविध शाळा, महाविद्यालय व वसतिगृहाकडे जाणारा् वर्दळीचा रस्ता आहे.या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट, रानडुक्कर या हिंस्र वण्याप्राण्यांचा मुक्त संचार सुरू असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. या परिसरात घडलेल्या अलिकडच्या पाळीव प्राण्यांवरील हल्ल्याच्या ताज्या घटनांचे दाखले त्यांनी निवेदनातून प्रशासनास दिले आहेत.

त्यामुळे नागरी वस्तीपासून ते दर्गा व लेणी परिसरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे दाट वाढलेली असल्यामुळे हे हिंस्र प्राणी या झाडाझुडुपांच्याआड लपून दबा धरून बसून राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर चक्क रोडवरदेखील संध्याकाळ व रात्रीच्या सुमारास अनेकदा बिबट्या,रानडुक्कर, कोल्हे, लांडगे व इतर हिंस्र वन्यप्राणी वावरताना येथील रहिवाशांना आढळुन आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे झाडाझुडुपांमध्ये दबा धरून लपून बसलेल्या वन्य प्राण्यांकडून या रोडवरुन जाणे येणे करणाऱ्या वाहनचालकांवर व पादचाऱ्यांवर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा एखादी अनुचित घटना घडू नये, यासाठी रोड लगतच्या परिसरात वाढलेली झाडेझुडपे तोडुन तो परिसर स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी युवासेना शहर प्रमुख राणा यांच्या सह निवेदनावर स्वाक्षरी करणारे अरुण सोनकुसरे,योगेश मालवे,प्रथमेश श्रीपतवार, दिनकर क्षिरसागर, गौतम मेहता, गजानन स्वामी, सोमेश दुबे, मनिश सोनकुसरे, नकुल पस्पुलवार, किरण चिरडे,प्रशांत पेंटेवाड या नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाकडे केली आहे.

## सोनखेड पोलीस ठाणे पुन्हा चार जिल्ह्यात अव्वल

**सोनखेड** -नांदेड परिक्षेत्रातील चार जिल्ह्यामधून सप्टेंबर महिन्यातील एकूण कामगिरी मध्ये पोलीस ठाणे सोनखेड नांदेड परिक्षेत्रामध्ये पुन्हा एकदा प्रथम क्रमांकावर राहिले आहे. यामध्ये विविध विभाग जसे जिल्हा विशेष शाखा (डीएसबी) यांच्या कडे चारित्र्य पडताळणी, पासपोर्ट, देणे व वेळेत नागरिकांना उपलब्ध करून देणे, गोपनीय माहिती काढणे, अशी कामे येतात दुसरे म्हणजे समन्स, वारंट वेळेत तामिल करणारे पोलीस कर्मचारी यांची कामगिरी बेलेबल व नॉन बेलेबल वारंट तामिल करणे तसेच वेगवेगळे बिट जमादार यांची त्यांच्या बिट मध्ये अवैध धंद्याना आळा घालणे व गुन्ह्याचे प्रमाणकमी असणे व दाखल गुन्हे निकाली लावणे अशा विविध प्रकारच्या मुद्याना मार्क असतात त्याच आधारावर मूल्यांकन केले जाते पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार ,अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव ,उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच पोलीस ठाणे सोनखेड येथील अधिकारी आणि सर्व अंमलदार यांनी प्रामाणिकपणे त्यांचे कर्तव्य पार पाडले यामुळेच सोनखेड पोलीस ठाणे नांदेड परिक्षेत्रामध्ये प्रथम क्रमांक वर येऊ शकले. पोलीस ठाणे सोनखेड येथील अधिकारी आणि सर्व अंमलदार यांचे ठाणे प्रभारी सपोनि पांडुरंग माने यांनी मनापासून अभिनंदन केले व सगळ्या स्टाफ च्या सहकार्याने हे सगळे होऊ शकले अशी भावना व्यक्त केली व माननीय नांदेड परीक्षेत्र चे विशेष पोलीस उप महानिरीक्ष शहाजी उमाप यांच्या हस्ते प्रमाण पत्र देण्यात आले.




## राज्य सदस्य पदी यशपाल जोंधळे व भिमराव खाडे यांची निवड




**मुदखेड** -मुदखेड तालुकयातील डोंगरगाव येथील आदिवासी आश्रम शाळेचे सहशिक्षक यशपाल जोंधळे शासनमान्य संघटना नाशिक आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना नाशिक महाराष्ट्र राज्य नाशिक यांच्या वतीने राज्य कार्यकारणी सदस्य म्हणून यशपाल जोंधळे यांची निवड करण्यात आली. यावेळी शासनमान्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम गायकवाड, संतोष राऊत राज्याध्यक्ष शासकिय,राजेश पाटील राज्याध्यक्ष अनुदानित, साहेबराव मोहोड विदर्भ अध्यक्ष,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सातही प्रकल्पातील प्रकल्प अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव आणि इतर पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनूमते विभागीय अध्यक्ष म्हणून शंकर माने (अनुदानित) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच तुकाराम अडबलवार यांची विभागीय अध्यक्ष (शासकिय) म्हणून बिनविरोध दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. तसेच राज्य सदस्य म्हणून भिमराव खाडे व संजय देशमुख यांची पण निवड करण्यात आली आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष विक्रम गायकवाड यांनी सर्व पदाधिकारी यांना मौलिक मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मोहोड यांनी केले तसेच अध्यक्षीय समारोप संतोष राऊत यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण खंडाळकर तर आभार प्रदर्शन विनोद पवार यांनी केले.

## गंगानगर परिसरातील नागरिकांची नावे चुकीच्या प्रभागात

**किनवट**-आगामी नगर परिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील मतदार याद्यांमधील त्रुटींबाबत तक्रारींचा ओघ वाढू लागला आहे. याच पार्श्वभूमीवर माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी नगर परिषद किनवट येथे लेखी तक्रार दाखल करून गंगानगर परिसरातील नागरिकांची नावे चुकीने प्रभाग क्रमांक १० मध्ये समाविष्ट करण्यात आल्याची माहिती दिली आहे. सदर तक्रारीत त्यांनी नमूद केले आहे की, गंगानगर परिसर भौगोलिकदृष्ट्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये येतो, तरीसुद्धा त्या भागातील सर्व मतदारांची नावे चुकीने प्रभाग क्रमांक १० मध्ये नोंदविण्यात आली आहेत. या चुकीमुळे संबंधित नागरिकांच्या मतदान अधिकारांवर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी निदर्शनास आणले आहे. साजिद खान यांनी या त्रुटीची तातडीने दुरुस्ती करून गंगानगर परिसरातील नागरिकांची नावे प्रभाग क्रमांक ९ मध्ये समाविष्ट करण्यात यावीत, अशी मागणी केली आहे. त्यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व अचूक राहावी यासाठी प्रशासनाने त्वरित तपासणी करून योग्य ती सुधारणा करावी, असे आवाहनही केले आहे. नगर परिषद प्रशासनाने या तक्रारीची नोंद घेतली असून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.



# जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १३ ऑक्टोबर-**

नांदेड जिल्हा परिषद सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज दि.१३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद नियोजन सभागृहात पार पडले तर हदगाव तालुक्यातील १२ पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने हदगाव येथे नियंत्रण अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे , तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात पार पडला.

हदगाव तालुक्यात एकूण ६ जिल्हा परिषद गट असून त्यापैकी निवघा ( बा) हा गट अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित झाला त्यानंतर रुई धानोरा हा सर्वसाधारण महिला, मनाठा हा गट नामाप्र महिला, पळसा हा गट नामाप्र, आष्टी हा गट नामाप्र व तामसा अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाले आहेत त्याचप्रमाणे पंचायत समितीचे एकूण १२ गणांच्या आरक्षण पुढीलप्रमाणे आहेत तळणी अनुसूचित जाती,निवघा बाजार सर्वसाधारण, रुई अनुसूचित जाती महिला, हरडफ नामाप्र महिला, कोळी नामाप्र महिला, मनाठा अनुसूचित जाती महिला, पळसा सर्वसाधारण , डोंगरगाव सर्वसाधारण, आष्टी अनुसूचित जाती महिला, उमरी (ज) सर्वसाधारण महिला, तामसा नामाप्र व लोहा हा गण अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाले असून हदगाव तालुक्यातील एकूण १२ पंचायत समिती गणाचे आरक्षण जाहीर झाले त्यामुळे अनेक इच्छुकांचे यावेळेस चांगलाच हिरमोड झाला असून काहींमध्ये मात्र उत्साह दिसून आला.

# शेतजमिनिचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना मयताच्या पत्नीचे नाव अनूदान यादीत

## तलाठ्याच्या विरोधात अमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १३ ऑक्टोबर-**

तालूक्यातील मौजे खरबी येथील मयत अनिल मंचकराव कल्याणकर यांचे नावे गट क्र.८०/१ क्षेत्रफळ ०१हेक्टर ११आरगट क्र.४३ क्षेत्रफळ ०हेक्टर ६०आर या जमिनिचा वाद न्याय प्रविष्ठ असताना माझी सून अंजली हि बेकायदेशीरपणे तलाठ्याला हाताशी धरुन सातबारा नावे नसताना ऑगष्ट २५ मध्ये अतिवृष्टिच्या अनूदान यादीत बेकायदेशीर नाव समाविष्ट केल्याप्रकरणी चौकशी करुन संबधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीकरीता मयत अनिलची आई शिलाबाई मंचकराव कल्याणकर यांनी दि.१३ ऑक्टोंबर पासून भोकर तहसीलसमोर अमरण उपोषण सूरु केले आहे.

अधिक माहिती अशी की उपोषणकर्त्या शिलाबाई कल्याणकर रा.खरबी ता.भोकर यांचा मूलगा अनिल कल्याणकर याचे दि.१८ ऑगष्ट २०१९रोजी निधन झाले त्याचे नावे वरिल प्रमाणे शेतजमिन आहे मयत अनिलची पत्नी अंजली हिस मूलबाळ नाही त्यामूळे वारसाहक्काचा वाद न्यायप्रविष्ट असताना सातबारा उताऱ्यावर कोठेही अंजलीचे नाव नसताना अंजली अनिल कल्याणकर हिचे नाव अतिवृष्टिच्या अनूदान यादीत कसे काय आले या बाबतीत सखोल चौकशी करुन संबधित तलाठी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिलाबाई कल्याणकर यांनी केली असून निवेदनाच्या प्रति उपविभागीय अधिकारी भोकर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना पाठविण्यात आले आहेत.




# निवडणूक रिंगणात उतरण्याचा सागर शिंदे यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १३ ऑक्टोबर-**

आज झालेल्या जिल्हा परिषद आरक्षण सोडतीत गोकुंदा गट खुल्या प्रवर्गासाठी राखीव सुटल्याने या गटातील निवडणूक समीकरणाला नव्या दिशा मिळाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा सौ. सागर शिंदे पाटील यांनी गोकुंदा जिल्हा परिषद गटातून पक्षाने संधी दिल्यास निवडणूक रिंगणात उतरायचा आपला निर्धार व्यक्त केला आहे.



सौ. सागर शिंदे पाटील या मागील काही वर्षांपासून भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चात सक्रिय असून त्यांनी संघटनात्मक कामातून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या सबलीकरणासाठी, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, तसेच शेतकरी व महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. सामाजिक बांधिलकीची जाण आणि जनतेशी दांडगा संपर्क ही त्यांची जमेची बाजू मानली जाते.

गोकुंदा परिसरात त्यांनी महिला बचतगट, विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन शिबिरे, तसेच जलसंवर्धन व पर्यावरण जनजागृतीसारखे विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे त्या स्थानिक पातळीवर लोकप्रिय झाल्या असून, पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण आहे.

भाजपच्या संघटनेतही सौ. शिंदे पाटील या कुशल संघटक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी गावागावात पक्षाचे विचार पोहोचवण्याचे काम सातत्याने केले असून, विविध निवडणुकांत पक्षासाठी जबाबदारीने काम केल्याचा त्यांना अनुभव आहे. त्यामुळे गोकुंदा गट खुला झाल्याने त्यांच्या उमेदवारीबाबत चर्चेला उधाण आले आहे.

स्थानिक राजकीय निरीक्षकांच्या मते, सौ. सागर शिंदे पाटील यांची उमेदवारी निश्चित झाल्यास गोकुंदा गटात भाजपला भक्कम उमेदवार मिळेल. त्यांच्या लोकप्रियतेचा व संघटनशक्तीचा फायदा पक्षाला निश्चितच होईल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

गोकुंदा गटातील आगामी निवडणुकीसाठीची राजकीय चढाओढ आता अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत असून, सौ. सागर शिंदे पाटील यांच्या नावावर स्थानिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. आगामी काळात भाजपकडून अधिकृत घोषणा होण्याची उत्सुकता मतदारसंघात आहे.

# ई.जे.बनसोडे यांचे अभिष्टचिंतन

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १३ ऑक्टोबर-**

सामाजिक व शैक्षणिक कार्यात सदा अग्रेसर असणारे भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक ई.जे. बनसोडे यांचे ८१ व्या वाढदिवसानिमित्त व्यंकटेश गॉर्डन येथे माजी.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने शाल पुष्पहार,घालून अभिष्टचिंतन केले

यावेळी माजी.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, माजी नगरसेवक बबनराव निर्मले, इंजि.बी.बी. गायसमुद्रे , भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष व्हि.के.कांबळे, माजी नगरसेवक नबी शेख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक वाय बी महाबळे, पोलिस पाटील श्रीरंग महाबळे, भाजपा माजी तालुका उपाध्यक्ष नागनाथ पाटील चुडावकर, पत्रकार विलास सावळे, विनोद महाबळे,सतीश आणेराव, दत्ता शेटे, बालाजी पाटील आईनवाडीकर, रवि कापुरे,पिनु चुडावकर, टिकाराम कतुरे,लक्ष्मी फुलवरे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महीला सरपंचाचे ६ महिन्याचे मानधन



**तभा वृत्तसेवा**
**तामसा, दि. १३ ऑक्टोबर-**

हदगाव तालुक्यातील येवली ग्रामपंचायतच्या महिला सरपंच शितल गजानन कंठाळे यांनी त्यांचे सहा महिन्याचे सरपंच पदाचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्याचा संकल्प करून त्यांनी तो निधी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचेकडे सुपूर्त केला आहे. त्यांच्या दानत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तालुक्यातील येवली गावच्या महिला सरपंच शितल कंठाळे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आपले सहा महिन्याचे मानधन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्याकडे सुपूर्त केले आहे. मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा संकटात सापडलेला पाहून त्यांना थोडीफार मदत हवी, या दृष्टिकोनातून महिला सरपंच कंठाळे यांनी खारीचा वाटा उचलण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे त्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना थोडीफार मदत होणार असल्याचे त्या म्हणाल्या. एक महिला सरपंच यांच्या पुढाकाराने समाजामध्ये मोठा आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या दायित्वाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# युवक महोत्सवत लावणीच्या तालावर तरुणाई थिरकली

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ ऑक्टोबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालय युवक महोत्सव



ज्ञानतीर्थ-२०२५ युवक महोत्सवत दिनांक १३ ऑक्टोबर रोजी मंच क्र. एक क्रांतिवीर बिरसा मुंडा मंचावर लावणी हा कलाप्रकार सादर करण्यात आला. अगदी पारंपारिक लावण्यापासून ते बैठकीच्या लावण्यापर्यंत विद्यार्थ्यांनी लावल्या सादर केल्या. विशेष म्हणजे मुलींनी तर लावण्या सादर केल्याच पण काही हौशी मुलांनीही लावण्या सादर केल्या.

'पारवळ घुमतय कसं अगबाई पारवळ घुमतय कसं', अहो सांगा राया, सांगा मी कशी दिसते? माझ्यावरती रसिक जणांच्या नजरा, दिलबरा करिते तुला मुजरा', 'माडीवरती उभे राहूनही वाट पाहिली काल वाटलं होतं तुम्ही याल राया वाटलं होतं तुम्ही याल', 'पोटासाठी नाचते मी परवा कुनाची', 'कुण्या गावाचं आलं पाखरू, अहो कुण्या गावाचं आलं पाखरू. बसलय डौलात खुदु खुदु हसतय गालात' अशा अनेक बहारदार लावण्या विद्यापीठ परीक्षेतील चारही जिल्ह्यांमधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केल्या. उपस्थित विद्यार्थ्यांनी तर टाळ्या आणि शिट्ट्या वाजून प्रतिसाद दिला.

हा कार्यक्रम बघण्यासाठी मुद्दामून प्र-कुलगुरु डॉ.अशोक महाजन, विद्यापीठाची कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सुर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालन डॉ. राजेश्वर दुडुकनाळे, ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसचे संचालक डॉ. विजय पवार, अधिसभा सदस्य यांच्यासह अनेक प्राध्यापक गुरुजन वर्ग उपस्थित होते. मंच क्र. एकवर सल्लागार मंडळ सदस्य डॉ. प्रताप देशमुख, डॉ. बालाजी भंडारे, डॉ. बालाजी सूर्यवंशी, डॉ. गजानन पाटील, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. कमलाकर चव्हाण यांनी धुरा सांभाळली आहे.

याशिवाय आज मंच क्र. दोनवर विडंबन अभिनय आणि एकांकिका चालू आहेत तर मंच क्र. तीनवर शास्त्रीय तालवाद्य व शास्त्रीय सुरवात्य चालू आहे. त्याचबरोबर समूह गायन पाश्चात्य ही होणार आहे. मंच क्र. चारवर वक्तृत्व स्पर्धा व वादविवाद स्पर्धा पार पडणार आहे. तर मंच क्र.पाचवर स्थळ छायाचित्रण, मेहंदी, चित्रकला, पोस्टर मेकिंग इत्यादी कला प्रकारांचे सादरीकरण होत आहे.

दि.१४.१०.२०२५ हा युवक महोत्सवाचा तिसरा दिवस. सकाळी मंच क्र. एकवर जलसा, आदिवासी नृत्य व लोकनृत्याचे सादरीकरण होणार आहे. तर मंच क्र. दोनवर शास्त्रीय नृत्य, नक्कल आणि एकांकिचे सादरीकारण होणार आहे. मंच क्र. तीनवर समूह गायन, शास्त्रीय गायन होणार आहेत तर मंच क्र. चारवर वादविवाद कथाकथनाचे सादरीकरण होणार आहे. मंच क्रमांक पाचवर मृदमूर्ती कला. रांगोळी. कलात्मक जुळवणी इत्यादी स्पर्धा पार पडणार आहेत.